वर्ष- १२ | अंक- १० | मुंबई, मंगळवार,२० जानेवारी २०२६ ते २६ जानेवारी २०२६ | पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027
PG|2

पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

शारीरिक हालचालींमुळे मृत्यूची जोखीम कमी

3 → दहशतीत हरवलेली लोकशाही मूल्ये!
हकालपट्टीनंतरही बांगलादेशी महिलांचा पुन्हा बेकायदेशीर मुंबईत प्रवेश ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

खाकी वर्दीची प्रतिमा मलीन करणारा प्रकार

बीडमध्ये पोलीस दलातील कर्मचाऱ्याने तरुणीला लग्नाचं आमिष दाखवत केलं लैंगिक शोषण



पोलीस दलातील सैनिकानं तरुणीशी जवळीकता साधली

घडलेल्या घटनेनुसार, पीडित तरुणी आष्टी तालुक्यातील एका गावातील रहिवासी असल्याचं सांगण्यात येत आहे. आरोपी हा पीडितेच्या घरानजीकच राहतो. तो पीडितेला ओळखत होता, त्याचाच फायदा घेत त्यानं पीडितेशी जवळीकता साधली आणि तिला लग्नाचे आमिष दाखवले. पीडितेचा विश्वास संपादन केल्यानंतर त्याने तिला लग्नाचे आश्वासन दिले होते. पीडितेच्या आई-वडील घरी नसताना किंवा संधी मिळेल तेव्हा आरोपीने पीडितेच्या घरात जाऊन तिच्यावर अनेकदा संशय व्यक्त केला होता. तिने अनेकदा पीडितेचे लैंगिक शोषण केले होते. याच काळात पीडितेनं त्याला अनेकदा लग्नाविषयी विचारले असता, तेव्हा तो काहीबाही सांगून विषय टाळून द्यायचा.

बीड। समाजाच्या रक्षणाची ज्यांच्या खांद्यावर जबाबदारी असते, अशाच एका पोलीस दलातील कर्मचाऱ्याने एका तरुणीचा विश्वासघात केल्याची धक्कादायक घटना घडली. लग्नाचे आमिष दाखवून एका २५ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याचा माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार आता उघडकीस आला आहे. या प्रकरणी नराधम पोलीस कर्मचाऱ्याविरोधात अंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेनं संपूर्ण बीड हादरून गेलं आहे. या घटनेनं पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाल्याचं चित्र आता समोर आलं आहे.

लग्नाचं आमिष दाखवून केलं लैंगिक शोषण

काही दिवसांपूर्वी पीडितेनं लग्नासाठी पोलिसांकडे तगादा लावून धरला होता. तेव्हा आरोपीने लग्नास नकार दिला होता. पीडितेला आपली फसवणूक झाल्याचं लक्षात येताच त्यांनी अंभोरा पोलीस ठाणे गाठलं आणि आपल्यासोबत घडलेला एकूण प्रकार सांगितला. पीडितेनं दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल

पोलीस कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल झाल्याने पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. या प्रकरणाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अंभोरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे करत आहेत. आरोपी सुट्टीवर असताना त्यानं हे कृत्य केले, तसेच यात इतर काही बाबी आहेत का, याचा शोध पोलीस घेत आहेत.

या घटनेमुळे पीडित तरुणीच्या कुटुंबाला मोठा मानसिक धक्का बसला असून, आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी परिसरातून होत आहे. रक्षकच भक्षक बनल्याने महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

सततच्या छळामुळे नैराश्यात, विद्यार्थीनीची आत्महत्या, कुटुंबियांचे गंभीर आरोप





दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार यशस्विनीच्या आईकडून कॉलेज प्रशासनाविरोधात कोणतीही अधिकृत तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. या आधारावर पोलिसांनी 'अकस्मात मृत्यू अहवाल' नोंदवला असून, मृत्यूमागची नेमकी कारणं शोधण्यासाठी तपास सुरू आहे, असं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

मुंबई। कर्नाटकची राजधानी बेंगळुरू येथील अनेककल परिसरातील एका खासगी डेंटल कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. २३ वर्षीय यशस्विनी हिने आत्महत्या करत आयुष्य संपवल्याची माहिती पोलीस तपासात समोर आलीये. या घटनेनंतर कॉलेज परिसरात तसेच विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना असून, निष्पक्ष चौकशीची मागणी होत आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यशस्विनी ही बंगळुरू ग्रामीण जिल्ह्यातील अनेककल भागात असलेल्या एका खासगी डेंटल कॉलेजमध्ये ओरल मेडिसिन आणि रेडियोलॉजी विभागाची तिसऱ्या वर्षाची विद्यार्थिनी होती. शुक्रवारी ती आपल्या घरी मृत अवस्थेत आढळून आली. घटनेची माहिती समजताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि प्राथमिक पंचनामा करण्यात आला.

यशस्विनीच्या मृत्यूची बातमी कॉलेज परिसरात पसरताच अनेक विद्यार्थी एकत्र जमले आणि कॉलेज व्यवस्थापनाला जाब विचारला. संस्थात्मक दबावामुळेच ही घटना घडली असावी, असा संशय काही विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. यामुळे काही काळ परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. मात्र परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप केला.

दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार यशस्विनीच्या आईकडून कॉलेज प्रशासनाविरोधात कोणतीही अधिकृत तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. या आधारावर

आंबेडकर चौक ते नीलसृष्टी मार्ग महिनाभर बंद

पालघर। पालघर शहरातील मुख्य रस्त्यांपैकी एक असलेल्या आंबेडकर चौक ते नीलसृष्टी अपार्टमेंट दरम्यान सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. या कामामुळे नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतुकीची सुसूत्रता राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष वाहतूक नियंत्रण अधिसूचना लागू केली आहे. ही सूचना ८ जानेवारी ते ५ फेब्रुवारी (रात्री १२ वाजेपर्यंत) अमलात राहणार आहे. या काळात सदर मार्गावरून सर्व प्रकारच्या वाहनांच्या प्रवेशावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. रस्त्याचे काँक्रिटीकरण सुरू असताना अपघात टाळण्यासाठी आणि कामात व्यत्यय येऊ नये, यासाठी हा मार्ग बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जड आणि हलकी अशा दोन्ही प्रकारच्या वाहनांना या बंद मार्गावरून जाण्यास मनाई असून, नियम मोडणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

वाहनचालकांसाठी पयार्यी मार्ग

- मार्ग १ : पालघर रेल्वे स्टेशन – जगदंबा हॉटेल – वीर सावरकर चौक (वळण चौक) मार्गे आंबेडकर चौक.
- मार्ग २ : पालघर रेल्वे स्टेशन – पृथ्वीराज चौक झ शिवाजी महाराज चौक मार्गे आंबेडकर चौक.

मृतदेहाचे तुकडे खाण्यासाठी अज्ञात व्यक्तीची केली हत्या

मुंबई। पश्चिम बंगालच्या कूचबिहार जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका व्यक्तीने मृतदेहाचे तुकडे खाण्यासाठी एका अज्ञात व्यक्तीची हत्या केली. पोलीस अधिकाऱ्यानं दावा केला की, चौकशीदरम्यान, आरोपीने पीडितेचं मांस खाण्याच्या हेतूने हत्या केल्याचा कबुलीनामा दिला. ही घटना कूचबिहार जिल्ह्यातील दिनहाट येथील कुर्शत परिसरात घडली, यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं.

नेमकं काय घडलं?

पोलिसांनी सांगितलं की, मृताची अद्याप ओळख पटवण्याचा पोलीस प्रयत्न करत आहेत. मृत व्यक्ती ही परिसरातील स्मशानभूमीजवळील



असलेल्या एका झोपडीत राहत होती. कुर्शात येथील एका तलावत तो मृतावस्थेत आढळला. वृत्तानुसार, मतदेह आढळून आल्यानंतर पोलिसांनी तपास सुरु केला. संशयित आरोपीचं नाव दौस आलम असल्याचं सांगण्यात येत आहे. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

आरोपीने 'त्या' गोष्टीसाठी अज्ञात व्यक्तीची केली हत्या

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दारूच्या नशेत असून या प्रकरणात पोलिसांनी दावा केला की, आरोपीने अज्ञात व्यक्तीची हत्या करण्यात आली होती, नंतर मृतदेह हा पाण्याच्या टाकीत नेला, तो स्वच्छ करत लपवण्यात आला. चौकशीदरम्यान. आरोपीने हत्येचा कबुलीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीने मानवी मांस खाण्याच्या उद्देशाने ही हत्या केली. हे नरभक्षकाचे लक्षण असल्याची दुर्मिळ घटना घडली आहे. यानंतर त्यांनी पुढे सांगितलं की, स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपीबाबतची माहिती मिळाली, नंतर त्याला अटक केली. सध्या या प्रकरणाची सखोल चौकशी केली जात आहे.

अँटॉप हिलमध्ये पाळीव कुत्र्याच्या भुंकण्यावरून वाद, १५ वर्षीय मुलावर चाकूहल्ला...

मुंबई। मुंबईतील अँटॉप हिल परिसरात कुत्र्याच्या भुंकण्यावरून झालेला किरकोळ वाद थेट हाणामारीत बदलला. गुरुवारी (दि. ८) राज हाइट्स टॉवर इमारतीत ही घटना घडली. या हल्ल्यात एका १५ वर्षीय मुलासह कुटुंबातील अनेक जण जखमी झाले आहेत.

कुत्र्याच्या भुंकण्यावरून शाब्दिक वाद

एफआयआरनुसार, तक्रारदार नरेश उदयभान बिडलान (वय ४७), हे बीएमसीमध्ये सफाई कर्मचारी आहेत. ते पत्नी वंदना आणि पुतण्या आर्यन कागड्रा (१५) यांच्यासोबत रात्री १०.३० वाजता पाळीव कुत्र्याला फिरवून घरी जात होते. लिफ्टजवळ थांबले असताना त्यांचे शेजारी लक्ष्मी डिक्का यांच्या नातेवाईक मुलावर त्यांचा कुत्रा भुंकला. यावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला.

लाकडी काठीने मारहाण

बिडलान यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाद वाढल्यानंतर त्यांना शिवीगाळ करण्यात आली. परिस्थिती शांत करण्याचे प्रयत्न सुरू असतानाच नितीन डिक्का (वय २५) घटनास्थळी आला आणि त्याने लाकडी काठीने बिडलान यांना मारहाण केली. यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

संपूर्ण इमारतीत दहशतीचे वातावरण

एफआयआरमध्ये नमूद केल्याप्रमाणे, संजना नावाच्या एका महिलेनेही बांबूच्या काठीने बिडलान यांच्या डोक्यावर प्रहार केला. याच वेळी अमन आणि तुषार यांनी आर्यनला मारहाण केली, तर जमावातील एका अज्ञात व्यक्तीने आर्यनच्या पाठीवर आणि हातावर चाकूने वार केला. या गोंधळात बिडलान यांची पत्नी वंदना यांनाही मारहाण करण्यात आली. झटापटीदरम्यान त्यांचे मंगळसूत्र तुटून हरवले. शेजाऱ्यांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला असता, नितीन डिक्काने बांबूची काठी दाखवत त्यांना धमकावले. त्यामुळे संपूर्ण इमारतीत दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गुन्हा दाखल... पोलिसांकडून तपास सुरू

मिळालेल्या माहितीनुसार, जखमींना सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अँटॉप हिल पोलिसांनी नितीन डिक्का, तुषार, सविता, अमन, कविता आणि शरणजीत यांच्यासह काही अज्ञात व्यक्तींविरोधात भारतीय न्याय संहिता आणि फौजदारी कायदा दुरुस्ती कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुढील तपास करत आहेत.



बडतर्फ आयएएस पूजा खेडकरला बांधून ठेवलं

आई-वडिलांना गुंगीचं औषध दिलं, घरातील नेपाळी नोकर मोबाईल घेऊन पळाला

मुंबई। आयएएस पदावरून बडतर्फ करण्यात आलेल्या डॉ. पूजा खेडकर यांनी त्यांच्या पुण्यातील राहत्या घरात चोरी झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. या संदर्भात त्यांनी चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात माहिती दिली असून, बाणेर रस्त्यावरील खेडकर कुटुंबाच्या बंगल्यात ही घटना घडल्याचे सांगितले जात आहे. ही घटना शनिवारी (दि.१० जानेवारी २०२६) रात्री घडल्याचा दावा करण्यात आला आहे. पोलिसांकडे देण्यात आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, खेडकर कुटुंबाकडे काम करणाऱ्या एका नोकरानेच हा प्रकार केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. संबंधित नोकराने दिलीप खेडकर आणि मनोरमा खेडकर यांना गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर त्याने डॉ. पूजा खेडकर यांना दोरीने बांधून ठेवत घरातील मोबाईल फोन घेऊन पळ काढल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणातील संशयित नोकर अवघ्या आठ दिवसांपूर्वी नेपाळमधून पुण्यात आला होता, अशी माहितीही पोलिसांकडून समोर आली आहे. तो काही दिवसांपासून खेडकर कुटुंबाच्या बंगल्यात काम करत होता. घटनेच्या वेळी घरात इतर कोणी उपस्थित नव्हते, अशी माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे. घटनेनंतर डॉ. पूजा खेडकर या बांधलेल्या अवस्थेत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, त्यांनी दाराच्या कडीचा वापर करून स्वतःला सोडवून घेतले. त्यानंतर घरात उपलब्ध असलेल्या दुसऱ्या मोबाईल फोनवरून त्यांनी चतुःश्रृंगी पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच चतुःश्रृंगी पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घराची पाहणी केली असता दिलीप खेडकर आणि मनोरमा खेडकर हे दोघेही बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. पोलिसांनी तत्काळ त्यांना उपचारासाठी एका खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचारानंतर त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दरम्यान, या घटनेप्रकरणी अद्याप कोणतीही लेखी तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. मनःस्थिती स्थिर झाल्यानंतर तक्रार दिली जाईल, असे डॉ. पूजा खेडकर यांनी पोलिसांना कळवले आहे. सध्या या प्रकरणी केवळ प्राथमिक माहितीच्या आधारे पोलिसांकडून तपास सुरू आहे. घरातून मोबाईल फोन व्यतिरिक्त इतर कोणतीही मौल्यवान वस्तू किंवा रोख रक्कम चोरीला गेली आहे की नाही, याबाबत सध्या कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पोलिसांकडून याची पडताळणी केली जात असून पुढील तपास सुरू आहे. या संपूर्ण घटनेचा अधिक तपास चतुःश्रृंगी पोलीस करत असून, संशयित नोकराचा शोध घेण्यासाठी विविध पथके काम करत आहेत. संबंधित नोकराचा शोध लागल्यानंतरच या प्रकरणातील नेमकी माहिती समोर येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.



पतीने पोलीस ठाण्यातच पत्नीवर झाडली गोळी अन्...

मुंबई। उत्तर प्रदेशातील हरदोई जिल्ह्यातून एक भयंकर घटना समोर आली आहे. पोलीस कोठडीत असलेल्या एका 35 वर्षीय महिलेची तिच्या पतीने दिवसाढवळ्या गोळी झाडून हत्या केल्याचं वृत्त आहे. संबंधित घटना बानगी पोलीस स्टेशन परिसरात घडली. घटनेतील पीडित महिलेचं नाव सोनी असून तिच्या पतीचं नाव अनूप असल्याची माहिती आहे. घटनेनंतर, गंभीररित्या जखमी झालेल्या महिलेला तातडीने जिल्हा रुग्णालयात नेण्यात आलं, तिथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाल्याचं सांगितलं जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रामापूर अटरिया गावातील रहिवासी असलेला अनूप आणि त्याची पत्नी सोनी दोघे गुरुग्राममध्ये काम करत होते. तिथे सुरजीत नावाच्या एका तरुणासोबत सोनीची ओळख झाली आणि त्या दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. अनूपला आपल्या पत्नीच्या विवाहबाह्य संबंधाची माहिती मिळताच त्याने सोनीला त्याच्या गावी सोडलं. परंतु, 7 जानेवारी रोजी सोनी तिचा प्रियकर सुरजीतसोबत घरातून पळून गेली. अनूपने याप्रकरणी सुरजीतविरुद्ध FIR दाखल केली होती.

अनूपने केलेल्या आरोपानुसार, सोनी तिच्यासोबत तिचे दागिने आणि घरातील 35,000 रुपये रक्कम घेऊन गेली होती. पोलिसांनी या प्रकरणात कारवाई करत सोनीला रविवारी ताब्यात घेतलं आणि सोमवारी सकाळी तिला कोर्टात सादर करण्याची तयार सुरू होती. सकाळी जवळपास 10.45 वाजता एक महिला कॉन्स्टेबल सोनीला पोलीस ठाण्याच्या कॅन्टीनच्या दिशेने घेऊन जात होती. तिथे सोनीचे नातेवाईक आणि पती अनूप तिला समजवण्यासाठी आले होते.

राग अनावर होताच पत्नीवर गोळी झाडली अन्...

दरम्यान, अनूपचा राग अनावर झाला आणि संधी मिळताच त्याने सोनीवर बेकायदेशीर पिस्तूलने गोळी झाडली. गोळी झाडण्याचा आवाज येताच, परिसरात एकच खळबळ उडाली. गोळी लागल्यानंतर, सोनी रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळली. त्यावेळी, पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या अनूप आणि त्याच्या एका साथीदाराला पोलिसांनी घेरलं आणि घटनास्थळावरूनच त्याला ताब्यात घेण्यात आलं. हत्येत वापरण्यात आलेलं हत्यारसुद्धा पोलिसांनी जप्त केल्याची माहिती आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी दिली माहिती

गरियाबंदचे जिल्हाधिकारी भगवान सिंह उइके यांनी माध्यमांना माहिती दिली की, राज्य प्रशासकीय सेवा अधिकारी असलेले रउड (महसूल) तुलसीदास मरकम यांना त्यांच्या पदावरून काढून टाकण्यात आलं आहे. पुढे ते म्हणाले की, तपास पूर्ण झाल्यानंतर, अहवाल रायपूर विभागीय आयुक्तांना पाठवला जाईल. त्यानंतर नियमांनुसार पुढील कारवाईचा निर्णय घेतला जाईल. शो-कॉज नोटिसनुसार, संबंधित अश्लील नृत्य कार्यक्रम 5 जानेवारी ते 9 जानेवारी असे चार दिवस सुरू होता. दरम्यान, या कार्यक्रमातील रउड चे फोटो आणि व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. मात्र, त्यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही.

अश्लील डान्स पाहण्यात अधिकारी दंग... पीसीएस अधिकाऱ्यासह तीन पोलिसांची मस्ती, पैसे उडवतानाचा व्हिडीओ व्हायरल

मुंबई। छत्तीसगढच्या गरियाबंद जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका ऑर्केस्ट्रा कार्यक्रमात अश्लील नृत्य सादर होत असताना उपविभागीय अधिकारी आणि पोलिसांची उपस्थिती असल्याचं समोर आलं. सोशल मीडियावर त्यांचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर, पोलीस प्रशासनावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आता या प्रकरणात, रउड ला त्यांच्या पदावरून काढून टाकण्यात आलं असून तीन पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.

हे संपूर्ण प्रकरण गरियाबंद जिल्ह्यातील देवभोग पोलीस स्टेशन हद्दीत आयोजित केलेल्या एका ऑर्केस्ट्रा कार्यक्रमाशी संबंधित आहे. मागील आठवड्यातच, उरमाल गावात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दरम्यान, या कार्यक्रमात अश्लील नृत्य सादरीकरण सुद्धा झालं आणि रविवारी या कार्यक्रमाचे व्हिडीओ सोशल मीडियावर



वेगाने व्हायरल झाले आहेत. या व्हायरल व्हिडीओमध्ये कार्यक्रमात पीसीएस आणि इतर पोलीस कर्मचारी उपस्थित असल्याचं स्पष्टपणे दिसून आलं. इतकेच नव्हे तर, अश्लील डान्स बघण्यासोबत ते पैसे उडवताना आणि व्हिडीओ रेकॉर्ड करताना देखील दिसून आले. या फोटो आणि व्हिडीओमुळे प्रकरण अधिक चर्चेत आलंय.

14 आयोजकांना अटक

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या प्रकरणासंबंधी गुन्हा दाखल करण्यात आला असून कार्यक्रमाच्या आयोजन समितीच्या 14 सदस्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, नियमांचं पालन न केल्याप्रकरणी आणि अश्लील कार्यक्रम आयोजित केल्याच्या आरोपाखाली ही कारवाई केली गेली आहे. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या तीन पोलिस अधिकारयांना तात्काळ निलंबित करण्यात आलं आहे आणि त्यांच्यावर बेशिस्तपणा तसेच कर्तव्यात कसूर केल्याचा आरोप लावण्यात आला आहे. आता, पोलीस विभागाने त्यांच्याविरुद्ध विभागीय कारवाई सुरू केली आहे.

पोलीस बातमी पत्र

विविध

२

मुंबई, मंगळवार,२० जानेवारी २०२६ ते २६ जानेवारी २०२६

शारीरिक हालचालींमुळे मृत्यूची जोखीम कमी

शरीराची हालचाल अधिक प्रमाणात झाल्यास (मग या हालचालींची तीव्रता कितीही असो) मध्यमवयीन आणि वृद्ध व्यक्तींना लवकर मृत्यू येण्याची जोखीम कमी होते, असा दावा एका अभ्यासात करण्यात आला आहे.

या अभ्यासाचे निष्कर्ष ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये (बीएमजे) प्रसिद्ध झाले आहेत. दिवसातील नऊ ते साडेनऊ तास एकाच ठिकाणी स्वस्थ बसून राहिल्याने, तसेच बैठ्या कामामुळे (यात झोपेच्या वेळेचा समावेश नाही) लवकर मृत्यू होण्याची जोखीम असते, असा दावाही या अभ्यासात करण्यात आला आहे.

१८ वर्षांपासून ६४ वर्षांपर्यंतच्या व्यक्तींनी आठवडाभरात किमान १५० मिनिटे मध्यम स्वरूपाचा व्यायाम, शारीरिक क्रिया कराव्यात किंवा कमीत कमी ७५ मिनिटे दमछाक करणारा व्यायाम-हालचाली कराव्यात, असे जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक सूत्रांमध्ये म्हटले आहे. अर्थात, हे सर्व प्रामुख्याने वैयक्तिक अनुभवांनुसार दिलेल्या माहितीवर आधारलेले आहे. यात अनेकदा अचूक माहितीचा अभाव असतो. त्यामुळे एखाद्याच्या आरोग्यासाठी त्याने नेमका किती वेळ आणि किती जोराचा व्यायाम करावा, याबाबत कोणतीही स्पष्टता नाही.



ओस्लोमधील (नॉर्वे) नॉर्वेजियन स्कूल ऑफ स्पोर्ट सायन्सचे प्राध्यापक उल्फ एकेलंड यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांनी मानवाच्या शारीरिक हालचाली आणि त्याने बसून व्यतीत केलेला काळ यांचा मृत्यूशी काय संबंध असू शकतो, याबाबत निरीक्षणात्मक अभ्यास केला आहे. व्यक्तीची दिवसातून किती हालचाल होते, हे मोजण्यासाठी त्यांनी एक्सिलेरोमीटरचा वापर केला. यात सावकाश चालणे, स्वयंपाक, भांडी धुणे अशा कमी तीव्रतेच्या हालचालींचा, तसेच वेगाने चालण्यासारख्या मध्यम तीव्रतेच्या हालचालींचा समावेश होता. अशा आठ पाहण्यांमध्ये ३६ हजार ३८३ लोक सहभागी झाले होते.

कडूलिंब घेतं त्वचा आणि केसांची काळजी

▮जर हातापायाला खूप घाम येत असेल तर कडूलिंबाचं तेल उपयुक्त आहे.

▮चेहऱ्यावर मुरुम झाल्यासही कडूलिंबाचं तेल उत्तम ठरतं. चेहऱ्यावर जुने डाग आणि उष्णतेनं पडलेले डाग जाण्यासाठी निंबोणीचं तेल लावावं.

▮फोड झाल्यास कडूलिंबाची साल घासून लेप लावावा.

▮जर केसांमध्ये उवा झाल्या असतील तर कडूलिंबाचं तेल लावावं.


▮टक्कल पडलं असेल तर कडूलिंबाचं तेल लावा.

▮केस पिकत असतील तर कडूलिंब आणि बोराची पानं उकळून त्या पाण्यानं केस धुवावेत. कमीत कमी एका महिन्यात आपल्याला फरक जाणवले.

▮कुष्ठरोगावर कडूलिंब वरदान ठरलंय. या रोगावर कडूलिंबानं उपचार होऊ शकतात.

▮ताप आल्यास, टायफॉईड झाल्यास कडूलिंबाची २०-२५ पानं, २०-२५ काळी मिरे एका गठ्ठ्यात बांधून अर्धा किलो पाण्यात उकळून घ्यावं. पाणी उकळू द्यावे आणि झाकण लावून ठेवावं. पाणी थंड झाल्यावर चार भाग बनवून सकाळ-संध्याकाळ दोन दिवसांपर्यंत प्यावं.







रोम छिद्रावर गुणकारी उपाय

प्रत्येक स्त्री सुंदर चेहऱ्यासाठी अनेक नवनवीन उपाय चेहऱ्यावर करत असते. त्यासाठी अनेक सौंदर्य प्रसाधनांचा देखील सर्रास वापर होतो. त्याचा वाईट परिणाम चेहऱ्यावर होत होते. कारण या प्रसाधनांमध्ये अनेक प्रकारच्या रसायनांचा वापर करण्यात आलेला असतो. परंतु या सुंदर त्वचेवर जर रोम छिद्र असतील तर चेहरा निस्तेज दिसतो. विशेषतः ज्यांची त्वचा तेलकट असते त्यांना रोम छिद्राची समस्या जास्त असते. वयाप्रमाणे हे छिद्र मोठे होतात. त्यामुळे या छिद्रांवर काही घरगुती उपाय फायदेशीर ठरतात.

केळी : केळी त्वचेसाठीही फार गुणकारी आहे. आठवड्यातून दोनदा केळी मॅश करून चेहऱ्यावर लावा. तुमच्या चेहऱ्याचे रोम छिद्र भरतील

दूध आणि ओट्स : २ चमचे ओट्समध्ये, १ चमचा गुलाबजल आणि १ चमचा मध एकत्र करून



घ्या. तयार केलेले मिश्रण १० मिनिटे चेहऱ्यावर लावा. त्यानंतर चेहरा स्वच्छ पाण्यात धुवा.

काकडी आणि लिंबू : खुले रोम छिद्र घालवण्यासाठी तुम्ही काकडी आणि लिंबूचा वापरू शकता. काकडी आणि लिंबूचा रस एकत्र करून लावल्याने चेहऱ्यावरील रोम छिद्र भरण्यास मदत होईल.

ॲसिडिटीपासून त्वचेच्या विकारांसाठी आहे पिंपळाचं झाड, जाणून घ्या फायदे

माणसाच्या तिन्ही मूलभूत गरजा पुरवणारं निसर्गाचं देणं म्हणजे वृक्ष. त्यामुळे वृक्षांना मनुष्याच्या जीवनात खूप महत्त्वाचं स्थान आहे. परंतु काळानुसार माणसाच्या गरजा बदलल्या आहेत. अनेक गावांमध्ये शहरीकरण झालं आहे. या आधुनिक युगामध्ये उंचच्या उंच इमारती बांधण्यासाठी झाडांची कत्तल करण्यात येते. त्यामुळे झाडांची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी होत आहे. परंतु झाडे मानवासाठी अत्यंत उपयुक्त असून त्याचे अनेक फायदे आहेत. यामध्ये डेरेदार वृक्षांचा सर्वाधिक फायदा होत असतो. वड, पिंपळ, आंबा, उंबर आणि गुलमोहर या झाडांचे अनेक गुणधर्म आहेत. विशेष म्हणजे या झाडांपासून केवळ सावलीच मिळत नाही तर त्याचे अन्यही फायदे आहेत. यामध्ये पिंपळ हे झाडं सर्वांगाने उपयुक्त आहे. चला तर मग जाणून घेऊयात पिंपळाच्या झाडाचे फायदे.

श्वास घेण्यास त्रास होणे : अनेकांना श्वसनासंदर्भातील आजार असतात. या आजारामध्ये पिंपळाचं झाडं हे अत्यंत उपयुक्त ठरतं. पिंपळाच्या झाडाची साल वाळवून त्याचं चूर्ण तयार करावं. या चूर्णाचं सेवन केल्यामुळे श्वसनाच्या आजारापासून काही काळ आराम मिळू शकतो. त्याप्रमाणेच पिंपळाची पाने दुधात उकळून ते प्यावे, यामुळे दमा असलेल्या व्यक्तींना आराम मिळतो.

ॲसिडिटी आणि गॅसेसची समस्या : अनेकांना वेळी अवेळी खाल्ल्यामुळे ॲसिडिटीची समस्या निर्माण होत असते. त्यामुळे जळजळ होणं, छातीत दुखणं या समस्या वरचेवर जाणवू लागतात. तर अनेकांना पित्ताचा त्रास असतो. अशा व्यक्तींनी पिंपळाच्या पानांचा रस काढून तो दररोज सकाळी प्यावा. यामुळे पित्ताची समस्या दूर होण्यास मदत मिळते.

दातदुखी : दातांची पकड मजबूत करण्यासाठी आणि दातांशी निगडित समस्यांचं निराकरण करण्यासाठी पिंपळ बहुगुणी ठरतो. १० ग्रॅम पिंपळाची साल, चुना आणि दोन ग्रॅम काळी मिरी घेऊन यांचं चूर्ण तयार करावं. या चूर्णाने दररोज दात घासावेत. यामुळे दातदुखी, दातातील किड यासारख्या समस्या दूर होतात.

विषबाधा झाल्यास : अनेक वेळा आपल्या नकळतपणे एखादी विषारी जीव किंवा प्राणी आपल्याला दंश करतो. अशावेळी तत्काळ उपचार म्हणून पिंपळाच्या पानांचा रस हळूहळू करून रुग्णाला पाजावा.

त्वचारोग : काही जणांची त्वचा ही सेन्सेटिव्ह असते. त्यामुळे कोणत्याही गोष्टींची त्यांना लगेच ॲलर्जी होते. यामध्ये मग शरीरावर डाग येणे किंवा खाज सुटणे या समस्या होता. अशा समस्यांवर उपाय म्हणून पिंपळाची कोवळी पाने खावीत किंवा त्याचा रस करून तो प्यावा. तसंच शरीराव फोड, पुरळ उठत असतील तर त्यावर पिंपळाच्या पानांची साल घासावी.

जखम झाल्यास : जखम झाल्यानंतर त्या जागेवर पिंपळाचं पान थोडंसं गरम करून त्याचा शेक द्यावा. तसंच रोज या पानांचा लेप करून तो जखम झालेल्या जागेवर लावावा. दरम्यान, हे उपाय करण्यापूर्वी डॉक्टरांचा आवर्जून सल्ला घ्यावा.



पायाला कांदा लावून झोपणे फायदेशीर

कांद्यातील अँटी बॅक्टेरिअल आणि अँटी व्हायरल तत्त्वांमुळे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. रात्री झोपताना पायमोजे घालून त्यात कांद्याच्या चकत्या ठेवण्याने शरीरातल्या घातक जिवाणू आणि किटाणूंचा नाश होतो तसेच रक्तशुद्धी साधते. पाहू याचे काही खास फायदे:



▮कांद्यामधील फॉस्फरिक ॲसिड रक्तामध्ये शोषलं जातं आणि रक्तशुद्धी होते.

▮कांद्याच्या उग्र वासामुळे खोलीतील हवा शुद्ध होतेच पण पायाची दुर्गंधीही नाहीशी होते. याने घातक रसायनं आणि विषारी तत्त्व शरीराबाहेर टाकण्यास मदत होते.

▮हा उपाय हृदयस्वास्थ्यासाठीही उपकारक ठरतो.

▮पायाजवळ कांद्याच्या चकत्या असल्यानं पोटातील संसर्ग दूर होतो. त्याचबरोबर किडनीशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत मिळते.

▮या उपायानं छोट्या आतड्यासंबंधीच्या त्याचप्रमाणे मूत्राशयासंबंधीच्या समस्याही दूर होतात.


▮शरीरामध्ये अधिक उष्णता असणाऱ्यांनी हा उपाय अवश्य करावा. याने अतिरिक्त उष्णता शोषली जाते आणि उष्णतेचा त्रास कमी होतो.

▮त्वचेनजीक कांद्याच्या चकत्या असल्यास शरीराचं तापमान वाढत नाही. त्यामुळे ताप आलेल्या अवस्थेमध्ये हा उपाय अवश्य करावा.

नाचणी-वाळकाचे पौष्टिक थालिपीठ

साहित्य : २ किसलेले वाळूक/वाळूख (वाळूक नसेल तर मध्यम आकाराची किसलेली काकडी), नाचणीचे पीठ - दीड वाटी, ज्वारीचे पीठ - २ वाट्या, चणाडाळीचे पीठ - १ वाटी, गव्हाचे पीठ - १/२ वाटी (ऐच्छिक), ओवा - चिमूटभर, चवीनुसार, तीळ - चिमूटभर, चवीनुसार, जिरे - चिमूटभर, चवीनुसार, हळद - चिमूटभर, चवीनुसार, लाल तिखट किंवा चिरलेली हिरवी मिरची - चवीनुसार, मीठ - चवीनुसार, ठेचलेल्या लसणाच्या ५-६ पाकळ्या, कढीपत्ता - वाळवून चुरलेला- अर्धी मूठ, उभा चिरलेला कांदा (ऐच्छिक). तेल - कडेने सोडण्यासाठी आणि थापण्यासाठी (ग्रीसिंग), पिण्यायोग्य पाणी.

पाककृती : सर्व पीठे एकत्र करावी. पिठात चवीचे साहित्य घालून चांगले मिसळावे. त्यात किसलेले वाळूक/काकडी घालून चांगले मिक्स करून घ्यावे. ताजी आणि रसदार फळभाजी असेल तर नंतर पीठ मळून घेतल्यास पाणी कमी लागते आणि चव चांगली येते. बेताने थोडे थोडे पाणी टाकत पीठ मळून गोळा बनवावा. थालिपीठ थापता येईल इतपत कन्सिस्टन्सी असावी. जाड बुडाच्या पॅनला (नॉन स्टिक असेल तर उत्तम) थोडे तेल लावावे, मळलेल्या पिठाचा गोळा हातावर चांगला गोल करून थोडासा पसरवून घ्यावा. हा चपटा गोळा पॅनला आतल्या बाजूने गोलाकार थापून घ्यावा. हाताला थोडेसे तेल लावावे म्हणजे पीठ चिकटणार नाही. पॅनवर झाकण ठेवून मोठ्या आचेवर थालिपीठे उलटसुलट भाजून घ्यावीत.



केसांसाठी घरगुती शाम्पू

तेलकट केसांसाठी

दोन चमचे शिकेकाई पावडर, एक चमचा हिरव्या चण्याची पावडर, अर्धा चमचा मेथी पावडर एकत्र करून चांगले मिश्रण तयार करावे. केसांना लावायच्या आधी मिश्रणात अंड्याचा पांढरा बलक घालून तो केसांना शाम्पूप्रमाणे लावा. हा शाम्पू केसांना लावल्यानंतर फेस येत नाही पण केस स्वच्छ होतात.

एक ग्लास रिठे, चार ग्लास पाण्यात रात्रभर भिजत ठेवाव्या. सकाळी हे पाण्यात कुस्करा व पाणी गाळून घ्या. या पाण्यात एक चमचा शिकेकाई पावडर मिसळून त्याने केस धुवा. केसांना चमक येते.

टोनिंग लोशन

ग्लासभर पाण्यात एक मोठा चमचा लाल व्हिनेगर व चिमूटभर मीठ टाकून चांगले हलवा. या मिश्रणाने केसांच्या मुळांना हळुवार मसाज करा. एका तासाने केस धुऊन नंतर विंचरल्याने केस मऊ होतात.

कोरड्या केसांसाठी शाम्पू

एक ग्लास दुधात एक अंडे फेटून घ्या. मिश्रणाला भरपूर फेस आल्यानंतर केसांना चांगल्या प्रकारे लावा. पाच मिनिटांनंतर केस स्वच्छ धुवा. आठवड्यातून दोनवेळा हा प्रयोग नक्की करा.

एका नारळाच्या दुधात दोन चमचे चण्याचे पीठ किंवा एक लहान चमचा शिकेकाई पावडर मिसळा. केसांच्या मुळांना हे मिश्रण चांगल्या प्रकारे लावा. पाच मिनिटांनंतर केस स्वच्छ धुवा.



काय आपल्यालाही अशा लोकांना पाहून जेलेस फील होते जे बेडवर पडल्याक्षणी झोपून जातात? तर आता जेलेस फील करू नका, कारण ही पद्धत अमलात आणून आपल्या बेडवर पडताक्षणी झोप येईल. या पद्धतीने आपण ३० सेकंदांत झोपाल.

जाणून घ्या 30 सेकंदांत झोपण्याची पद्धत

tq सेकंदांत झोप येण्यासाठी आपल्याला कोणत्याही उपकरणाची गरज नाही.

▮सर्वात आधी हुश्श आवाज करत तोंडातून श्वास सोडा. ▮तोंड बंद करून नाकाने हळूवार श्वास घ्या. ▮आपला श्वास सात अंक मोजेपर्यंत थांबवून ठेवा. ▮आता आठ अंक मोजेपर्यंत तोंडातून श्वास सोडत राहा. ▮पुन्हा श्वास घ्या.

एकूण चार श्वासांसाठी हे चक्र तीनदा रिपीट करा.

हे करताना खोल श्वास घ्या आणि सोडा. याने हृदयाच्या ठोक्याचा दर कमी होतो आणि मेंदू शांत राहतो. याने आपण ३० सेकंदांतच शांत झोपतो. लवकर झोप येण्यासाठी हा उत्तम उपाय आहे.



सुंदर चेहऱ्यासाठी 'ही' पाने अत्यंत लाभदायक

चेहरा सुंदर दिसण्यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करत असतो. मुली अनेक सौंदर्य प्रसाधनांचा



सुद्धा वापर करतात. पण ते त्वचेसाठी घातकसुद्धा ठरू शकतात. अनेक कार्यक्रमांमध्ये किंवा जेवणानंतर अनेकांना पान खाण्याची सवय असते. पण या खाण्याच्या पानांमध्ये सौंदर्याचं रहस्य दडलेलं आहे. या पानाचा केवळ खाण्यासाठीच नव्हे तर सौंदर्य खुलवण्यासाठी देखील उपयोग होतो.

चेहरा उजळण्यासाठी : खायची पाने ३-४ मिनिटे पाण्यात उकळून घ्या. आता याची पातळ पेस्ट बनवून चेहऱ्यावर लावा. तुम्ही यामध्ये थोडे बेसन घालू शकता. १५ मिनिटांनी चेहरा थंड पाण्याने धुवा.

मुरुमांपासून सुटका : पानाच्या फेसपॅकने चेहरा उजळण्यासह डाग व मुरुमांपासून सुटका मिळते. पानाच्या पेस्टमध्ये थोडी हळद मिसळून घ्या. ही पेस्ट मुरुमांवर लावा. काही वेळाने चेहरा धुऊन घ्या. असे २-३ वेळा केल्यास मुरुमांपासून सुटका मिळेल.

शरीरावर येते चमक : अंघोळीच्या पाण्यात पान मिसळून वापरल्याने घामाच्या दुर्गंधीपासून तुमची सुटका होईल.

माऊथ फ्रेशनर : पान हे उत्तम माऊथ फ्रेशनर आहे. पानांना उकळून त्यापासून माऊथ वॉश बनवता येतो. एका भांड्यात पाणी घेऊन त्यात पाने मिसळून उकळून घ्या.

हे पाणी एका भांड्यात साठवून ठेवा. याच्या नियमित वापराने तोंडाचा दुर्गंध घालवता येईल.

फिरायला जाताना गुगल मॅप्सची 'ही' तीन फीचर्स येतील खूप कामी

आजकालच्या धकाधकीच्या जीवनात घरातल्यांसोबत किंवा फॅमिलीसोबत आपण बाहेर फिरायला जातो, तेच काही क्षण खास आणि आनंदाचे असतात. अशात आता उन्हाळ्याची सुट्टी संपली असली तरी आता पावसाळी पिकनिकसाठी देखील अनेक जण सज्ज झाले आहेत. तर अशावेळी तुम्ही देखील भटकंतीसाठी कुठेतरी बाहेर फिरायला जाण्याचा विचार करत असाल तर गुगल मॅपची खास वैशिष्ट्ये तुमच्यासाठी फारच फायद्याची ठरू शकतात. चला तर जाणून घेऊया गुगल मॅप्सची काही खास फीचर्स जी तुम्हाला पिकनिकला गेल्यावर फारच कामाला येतील.

ग्लान्सेबल डायरेक्शन्स

गुगल मॅप्समध्ये ग्लान्सेबल डायरेक्शन्स फीचर सुरू करण्यात आलं आहे. ही सेवा वापरून युजर्स लॉक स्क्रीनच्या माध्यमातून देखील आपला रस्ता ट्रॅक करू शकतात. हे फीचर चालू केल्यानंतर, वापरकर्त्यांना पुढे येणारे वळण किंवा कोणत्याही अपडेटबद्दल कळवले जाईल. यापूर्वी ही माहिती फक्त फुल नेव्हिगेशन मोडमध्ये दिली जात होती. हे फीचर काही महिन्यांतच जगभरात आणले जाईल. हे वॉकिंग, सायकलिंग आणि ड्रायव्हिंग मोडमध्ये मदत करेल. हे अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही डिव्हाईसवर उपलब्ध करून दिले जाईल.

रिसेंट ॲप्समध्ये लोकेशन होणार सेव्ह

गुगलने गुगल मॅप्समध्ये एक नवीन सेवा जारी केली आहे जी वापरकर्त्यांना गुगल मॅप्सची विंडो



बंद केल्यावरही त्यांच्या रिसेंट ॲप्समध्ये लोकेशन सेव्ह करून ठेवण्याची सोय करून देतील. वापरकर्त्यांना त्यांनी यापूर्वी भेट दिलेली सर्व ठिकाणे हटवण्याची परवानगी आहे. हे फीचर वापरकर्त्यांना पिकनिक किंवा विशिष्ट ठिकाणी जाताना त्यादरम्यान विश्रांती घेतल्यावरही जिथे प्रवास थांबवला तिथून पुढे सुरू करता येणार आहे.

इमर्सिव्ह व्ह्यू

गुगलने अलीकडेच ॲमस्टरडॅम, डब्लिन, फ्लॉरेन्स आणि व्हेनिस या चार शहरांमध्ये इमर्सिव्ह व्ह्यू सादर केलं आहे. लवकरच इतर ठिकाणीही हे फीचर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये, प्रगत एआय तंत्रज्ञानाचा वापर करून, इमर्सिव्ह व्ह्यू फीचर अगदी वास्तवदर्शी स्थान, ठिकाणं तयार करते.

रिसेन्टर

हे गुगल मॅप्समधील फीचर तसं जुनंच आहे, पण सर्वांत कामाचं फीचर आहे. कारण आपण गुगल मॅपच्या मदतीने कुठेही जात असताना थोडं जरी आपल्या मोबाईलची दिशा बदलली आणि आपल्याला आपला ट्रॅक दिसत नसेल तर रिसेन्टरवर क्लिक करताच आपण पुन्हा ट्रॅकवर येतो. तसंच मॅप पाहताना एखादुसरं ठिकाण आपण मॅपमध्ये पाहत असू तरी आपला ट्रॅक भरकटतो पण रिसेन्टरवर क्लिक करताच आपण पुन्हा ट्रॅकवर येतो.

हवं ते वाहन किंवा वॉकिंग ऑप्शन सिलेक्ट करणं

आता हे फारच कॉमन आणि सर्वांना माहीत असलेलं फीचर आहे. आपण कधीही गुगल मॅप्स वापरताना आपल्याला हवं असलेलं लोकेशन टाकतो आणि त्यानंतर

सदैव निरोगी राहायचेय मग लिंबूपाणी प्या

सदैव ताजेतवाने आणि फ्रेश राहण्यासाठी लिंबूपाण्याचे सेवन नियमित केलेले चांगले. लिंबूमध्ये 'क' जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात असते. शरीरासाठी आवश्यक असणारी 'क' जीवनसत्त्वाची कमतरता लिंबूपाणी सेवनाने भरून काढता येते. लिंबूपाण्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्याबरोबरच पोटॅशिअमचीही गरज पूर्ण होते. पोटॅशिअममुळे आपल्या मेंदूला फायदा होतो आणि ब्लडप्रेशरवरही नियंत्रण ठेवता येते. तुम्हाला जर चहा, कॉफीची सवय कमी करायची असेल तर लिंबूपाणी उत्तम.

लिंबूपाणी सेवनाचा आणखी एक फायदा म्हणजे रक्तशुद्धी, ज्यामुळे शरीर स्वस्थ राहण्यास मदत होतेच आणि शरीर ताजेतवाने राहते. जीवनसत्त्वाने भरपूर आणि लाभदायक असे हे लिंबूपाणी



कधीही सेवन केले तरी चालते मात्र रात्री जेवणानंतर घेऊ नये. हे आपल्या शरीरासाठी हानीकारक ठरू शकते.

संपादकीय

दहशतीत हरवलेली लोकशाही मूल्ये!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



महापालिकेच्या निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव असावा अशी अपेक्षा असते, पण गेल्या दोन दिवसांतील चित्र बघता सध्या महाराष्ट्रातील बहुतांश शहरी भागात ही प्रक्रिया उत्सव न राहता एक उघड बाजार बनत चालली आहे. या बाजारात मतं विकत घेतली जात आहेत, नाती तोडली जात आहेत, समाज फोडला जात आहे आणि शेवटी सत्तेच्या बदल्यात मूल्यांची होळी केली जात आहे. निवडणुकीच्या स्पर्धेत कोण कुणाला पाडतो, कोण कुणाला विकत घेतो, कोण कुणाला धमकावतो आणि कोण कुणाला जातीत विभागतो हे आता गुपित राहिलेले नाही. निवडणूक जाहीर होण्याआधीच पैशांचे वाटप कसे करायचे, कोणत्या भागात किती खर्च करायचा, कोणत्या समाजघटकासाठी कोणता 'पॅकेज' ठेवायचा याचे नियोजन केले गेले. पैसा हा निवडणुकीचा आत्मा बनला आहे. नोटा, पाकिटं, व्यवहार, दारू याबद्दल कोणी कुजबुजत नाही; याबद्दल सगळ्यांना माहिती असते. प्रत्येक पक्ष दुसऱ्यावर आरोप करतो, पण प्रत्यक्षात कोणताही पक्ष या घाणेरड्या व्यवस्थेच्या बाहेर नाही. उलट स्पर्धा याचीच आहे की कोण जास्त पैसा ओततो, कोण जास्त प्रभाव टाकतो आणि कोण जास्त 'मॅनेजमेंट' करतो. या सगळ्यात शहरातील खऱ्या प्रश्नांना मात्र कुठेच जागा उरलेली नाही. कमी दाबाने येणारे पाणी, फुटलेले रस्ते, वाढते खड्डे, वाहतुकीचा बोजवारा, महापालिकेची ढासळलेली आर्थिक स्थिती, वाढती बेरोजगारी, शहरातून बाहेर पडणारे तरुण, आरोग्यसेवेतील अपुऱ्या सुविधा या कोणत्याही मुद्द्यावर चर्चा होत नाही. कारण या मुद्द्यांवर बोलायचं म्हणजे जबाबदारी घ्यावी लागते. उत्तर द्यावं लागतं. आणि जबाबदारी घ्यायची तयारी कोणत्याही पक्षाची किंवा नेत्याची नाही. मतं मिळवणं हेच अंतिम ध्येय राहिलं आहे.

या निवडणुकांमध्ये सर्वात धोकादायक बाब म्हणजे समाजाचं जाणीवपूर्वक विघटन. शहरातील सामाजिक ताळमेळ मोडायला आता नेत्यांनीच सुरुवात केली आहे. जातीच्या आधारावर मतदारांची मोजदाद केली जात आहे. अमुक जात कुणाला मतदान करते, तमुक समाज कुठे झुकतो याची आकडेमोड होत आहे. त्या त्या समाजातील प्रभावशाली व्यक्तींशी गुप्त करार केले जात आहेत. एका गटाला आश्वासनं दिली जात आहेत, दुसऱ्या गटाला वेगळं आमिष दाखवलं जात आहे. या आश्वासनांना कोणताही ठोस आधार नाही, पण त्यातून नवे वाद निर्माण होत आहेत हे मात्र निश्चित. एकाच प्रभागात राहणारे लोक दोन किंवा तीन गटांत विभागले जातात. नातेवाईकांमध्ये राजकारण शिरतं. घराघरांत तणाव वाढतो.

एकमेकांवरचा विश्वास कमी होतो. हे सगळं अपघाताने घडत नाही, तर मुद्दाम घडवून आणलं जातं. धर्माच्या नावावरही हेच छुपं राजकारण सुरू आहे. थेट भाषणांतून नाही, पण मंदिर, मशीद, धर्मसंस्था, समुदाय यांच्या माध्यमातून वातावरण तापवलं जातं. कोणत्या पक्षाचा चेहरा पुढे नसतो, पण त्यांच्या परवानगीशिवाय हे घडत नाही हे सगळ्यांना माहीत असतं. मतदानाच्या आधी विशिष्ट गटांना धार्मिक किंवा जातीय ओळख सांगून एकत्र केलं जातंय आणि दुसऱ्या गटाच्या विरोधात उभं केलं जातंय. याचा थेट परिणाम समाजावर होतो. शहरं तुटक होतात, माणसं परकी बनतात आणि निवडणूक संपल्यानंतरही या विषाची झळ कायम राहते. पण नेत्यांना त्याचं काहीच देणंघेणं नसतं, कारण त्यांचा उद्देश पूर्ण झालेला असतो.

या सगळ्या प्रक्रियेत कार्यकर्त्यांची अवस्था तर आणखीच दयनीय आहे. त्यांना विचार करण्याची मुभा नाही. उमेदवार कोण, त्याचा भूतकाळ काय, त्याचे व्यवहार काय याबद्दल प्रश्न विचारायचा अधिकार नाही. त्यांना फक्त काम दिलेलं असतं. घराघरांत जाऊन मते मागायची, विरोधकांविरोधात अफवा पसरवायच्या, कुणाला धमकवायचं, कुणाला आमिष दाखवायचं याची ठराविक जबाबदारी दिली जाते. यात राजकीय शिक्षण नाही, मूल्य नाही, केवळ 'काहीही करून जिंकायचं' हीच भूमिका असते.

दारू आणि पैशांचा खेळ तर इतका बिनधास्त झाला आहे की त्याबद्दल कोणालाही लाज वाटत नाही. कुठे दारू वाटली जाणार, कोणत्या वेळेला, कोणत्या मार्गाने हे सगळं गावातील प्रत्येक तरुणाला माहीत असतं. प्रत्येक घरातील प्रौढाला या व्यवहारांची कल्पना असते. पण कोणताही पक्ष, कोणताही नेता किंवा प्रशासन हे थांबवत नाही. उलट डोळेझाक केली जाते. नागरिकांनाही हळूहळू हे स्वीकारावं लागतं की या गोष्टींना विरोध केला तर आपणच टार्गेट बनू. याच कारणामुळे नितीमत्तेच्या राजकारणाचा जवळजवळ अंत झाला आहे. खोटं बोलणं, खोटी आश्वासनं देणं, उघड भ्रष्टाचार करणं, जातीधर्माच्या नावावर लोकांना भडकावणं, विरोधकांवर खोटे आरोप करणं हे सगळं आता सामान्य झालं आहे. लोकांनीही नेत्यांकडून आदर्शांची अपेक्षा ठेवणं सोडून दिलं आहे. प्रत्येक नेता सारखाच आहे अशी भावना रुजत चालली आहे. कोणताही पक्ष स्वतःला पूर्णपणे स्वच्छ म्हणवू शकत नाही. भाषणांत आदर्शवाद आणि प्रत्यक्ष कामात स्वार्थवाद हीच स्थानिक राजकारणाची ओळख बनली आहे.

याच काळात निवडणुकांच्या राजकारणाला गुंडगिरीची भयावह किनार मिळालेली दिसते. मतांची लढाई आता शब्दांपुरती मर्यादित न राहता थेट दहशतीच्या मार्गावर गेली आहे. काही प्रभागांमध्ये राजकीय वर्चस्व सिद्ध करण्यासाठी गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा उघड वापर केला जात आहे. विरोधी गटाला दबावात आणण्यासाठी धमक्या देणे, प्रचार फाडणे, सभा उधळणे, कार्यकर्त्यांना मारहाण करणे या घटना सर्रास घडत आहेत. काही ठिकाणी हे वैमनस्य इतकं टोकाला गेलं आहे की, राजकीय रागातून थेट खून झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. हे खून कोणत्या क्षणिक संतापातून झालेले नाहीत, तर सत्ता, पैसा आणि प्रभाव टिकवण्यासाठी आखलेल्या संघषार्चा भाग आहेत, हे वास्तव अधिक अस्वस्थ करणारे आहे. गुंडांना राजकीय संरक्षण मिळत असल्याची भावना असल्यामुळे त्यांचे धाडस वाढत चालले आहे, तर सामान्य नागरिक भयग्रस्त होत आहेत. तक्रार करायची म्हटली तर सूड उगवला जाईल या भीतीने अनेकजण गप्प राहतात. प्रशासन आणि पोलीस यंत्रणाही अनेक ठिकाणी निष्क्रिय किंवा दबावाखाली असल्याचे चित्र दिसते. निवडणुकीच्या नावाखाली जर गुंडगिरीला मोकळं रान दिलं गेलं, तर लोकशाही केवळ कागदावर उरेल आणि शहरांच्या सामाजिक सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होईल.

या सगळ्याचा सर्वात मोठा परिणाम समाजावर होतो. लोकांमधला विश्वास झिजतो. सौहार्द कमी होतं. तरुणांना राजकारण म्हणजे भ्रष्ट व्यवहारांचा, पैशांचा आणि दारूचा रस्ता वाटू लागतो. चांगले, प्रामाणिक लोक राजकारणापासून दूर राहतात. आणि जे निवडून येतात, त्यांचं पहिलं ध्येय प्रभागाचा विकास नसून निवडणुकीत खर्च केलेला पैसा परत मिळवणं असतं. त्यानंतर शहर, नागरिक, प्रश्न याकडे लक्ष द्यायला वेळच उरत नाही.

महापालिकेच्या निवडणुकीतून हे स्पष्ट झालं आहे की, महाराष्ट्रात राजकारणाचं मूलभूत तत्त्वच बदललं आहे. लोकांचा विश्वास जिंकणं, मूल्यांवर आधारित राजकारण करणं, शहराच्या गरजांकडे गांभीयार्ने पाहणं यासाठी कोणताही पक्ष तयार नाही. सत्ता मिळवणं हा एकमेव उद्देश उरला आहे. आणि त्या उद्देशासाठी सामाजिक विघटन, जातीय प्रक्षोभ, आर्थिक प्रलोभनं आणि राजकीय ढोंग यांचा सर्रास वापर केला जातो. हे विदारक चित्र थांबवायचं असेल तर प्रथम या ढोंगीपणाला ओळखलं पाहिजे आणि त्याला नावानिशी विरोध केला पाहिजे. जोपर्यंत राजकीय पक्षांना त्यांच्या कृत्यांची सामाजिक किंमत मोजावी लागत नाही, तोपर्यंत ही व्यवस्था बदलणार नाही. बदल हवा असेल तर तो वरून नाही, तर खालीपासून, लोकांच्या दबावातूनच यावा लागेल. घराणेशाही, पैसा आणि दारू यांच्या पलीकडे जाऊन लोकांनी स्वतःचे प्रतिनिधी घडवले, तरच महापालिकेच्या निवडणुकांना पुन्हा अर्थ प्राप्त होईल. नाहीतर या निवडणुका लोकशाहीचा उत्सव न राहता लोकशाहीची शोकांतिका ठरत राहतील.

या सगळ्या अस्वस्थ करणाऱ्या वास्तवाला धुडकावून लावत मतदान करताना नागरिकांनी क्षणिक आमिषांपेक्षा दीर्घकालीन परिणामांचा विचार केला पाहिजे. उमेदवाराचा अभ्यास म्हणजे केवळ त्याचं भाषण ऐकणं नाही, तर त्याचा मागचा इतिहास, त्याचं सार्वजनिक वर्तन, त्याने घेतलेली भूमिका, संकटाच्या काळात तो कुणाच्या बाजूने उभा राहिला आणि सत्तेबाहेर असतानाही तो समाजाशी जोडलेला राहिला का याचा प्रामाणिक आढावा घेणं आहे. पैसा, दारू, जात, धर्म किंवा भीती यांपैकी कुठल्याच गोष्टींना मत देणं म्हणजे आपलाच हक्क विकून टाकणं होय, हे मतदारांनी ठामपणे लक्षात ठेवलं पाहिजे. मतदान हे उपकार नाही, तो आपला अधिकार आहे आणि तो अधिकार निर्भयपणे, विवेकाने आणि स्वाभिमानाने बजावणं हीच लोकशाहीच्या उत्सवाला खरी प्रतिष्ठा आहे. एक सुजाण मत केवळ उमेदवार निवडत नाही, तर संपूर्ण प्रभागाचं आणि शहराचं भविष्य ठरवतं, याची जाणीव ठेवूनच यावेळी मतदान करायला हवं.

जाहिरातींच्या मोहजालाने व्याधीग्रस्तांची फसवणूक!



आरोग्य सेवा देण्याचा दावा करणाऱ्या आकर्षक जाहिरातींमधील कंपन्यांच्या, संस्थांच्या औषधांची कोणतीही शहानिशा न करता आंधळेपणाने विश्वास ठेवणे धोकादायक आहे. ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींना आळा घालण्यासाठी १९८५ साली ॲडव्हर्टायझिंग स्टॅण्डर्ड कौन्सिल ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. यामुळे या भारतीय जाहिरात मानक परिषदेकडे अशा प्रकारे दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींविरोधात तक्रारींचा पाऊस पडत आहे. कारण जाहिराती खऱ्या समजून आरोग्य सेवा घेणाऱ्यांची फसवणूक झालेली आहे. तुमच्या गुडघ्यात प्रचंड वेदना होत आहेत? चालताना कटकट असा आवाजही येतोय? कंबरदुखीही आहे? मग या सर्व समस्यांवर आमचे अमुक तमुक औषध हाच एकेमव उपाय, अकाली केस पांढरे होत आहेत? केसही गळताहेत? टक्कल पडतयं? मग फक्त आमचं तेल तुमच्या या सर्व समस्या दूर करेल, वजन वाढलयं? मग जीमला न जाता, डाएट न करता आमचा फक्त एक कप चहा प्या आणि वजन कमी करा. या आणि अशाच आशयाच्या जाहिराती सेलिब्रिटी टीव्हीवर, रिलवर करत असल्याचे बघतच आता प्रत्येकाची सकाळ होत आहे. या जाहिरातींचा प्रभाव जनमानसावर इतका होत आहे की या जाहिरातींवर विश्वास ठेऊन अनेकांचे खिसे रिकामे होत आहेत तर या जाहिरातींमध्ये उत्तम आरोग्य सेवा देण्याचा दावा करणाऱ्या बोगस कंपन्या मात्र आपले खिसे भरत आहेत.

थोडक्यात काय तर आरोग्य सेवा देण्याचा दावा करणाऱ्या आकर्षक जाहिरातींमधील कंपन्यांच्या, संस्थांच्या औषधांची कोणतीही शहानिशा न करता आंधळेपणाने विश्वास ठेवणे धोकादायक आहे. ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींना आळा घालण्यासाठी १९८५ साली ॲडव्हर्टायझिंग स्टॅण्डर्ड कौन्सिल ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. यामुळे या भारतीय जाहिरात मानक परिषदेकडे अशा प्रकारे दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींविरोधात तक्रारींचा पाऊस पडत आहे. कारण जाहिराती खऱ्या समजून आरोग्य सेवा घेणाऱ्यांची फसवणूक झालेली आहे. विविध उत्पादनांची, कंपन्यांची, शैक्षणिक संस्थांची, आरोग्य सेवा देणाऱ्यांची माहिती जाहिरातीच्या माध्यमातून अधिकाधिक जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम जाहिरात कंपन्या सोशल मीडियाच्या माध्यमातून करत असतात. पण गेल्या काही वर्षात विविध क्षेत्राच्या तुलनेत उत्तम आरोग्य सेवा देण्याचा दावा करणाऱ्या कंपन्यांचा, उपचार केंद्रांचा, जाहिरातींचा आकडा सर्वाधिक आहे. कारण या जाहिरातींमधील उत्पादन, उपचारांचा संबंध थेट ग्राहकांच्या आरोग्याशी असल्याने ग्राहक या जाहिरातींना गांभीयार्ने घेतात.

यातील बोटावर मोजणाऱ्या संस्था, कंपन्या खऱ्या अर्थाने ग्राहकांना योग्य आरोग्य सेवा देत आहेत. तर काही मात्र फक्त ग्राहकांच्या मानसिकतेचा, अज्ञानाचा गैरफायदाच घेत आहे. यात प्रामुख्याने स्थूल, गुडघेदुखीने त्रस्त, मधुमेह, बीपी, थायरॉईड, वंध्यत्व असर्णाया व्यक्ती अशा जाहिरातींना बळी पडत असल्याचे समोर आले आहे. कोरोनानंतर सगळेच आरोग्याप्रती जागरूक झाले आहेत. याचाच गैरफायदा घेत अनेकांनी आरोग्य सेवेच्या नावाखाली आपली दुकानं सुरू केली आहेत. यात प्रामुख्याने सध्याच्या बिझी लाईफस्टाईलमुळे स्थूलता, गुडघेदुखीने, मधुमेह, बीपी, थायरॉईड, वंध्यत्व अशा विविध आरोग्याशी संबंधित समस्यांनी त्रस्त व्यक्तींना डोळ्यासमोर ठेऊन आकर्षक जाहिराती तयार करण्यात येत आहेत. पण उपचार घेतल्यानंतरही आराम मिळत नसल्याने किंवा रिझल्ट मिळत नसल्याने संबंधित कंपन्यांना याबाबत जाब विचारता अजून काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला देत ग्राहकांकडून अधिकाधिक पैसे उकळण्याचा धंदाच या कंपन्यांनी, सेंटर्सनी सुरू केला आहे. यामुळे जाहिरातीत कंपन्यांनी केलेला दावा फोल असल्याचे लक्षात आल्यानंतर ग्राहक या खोट्या जाहिरातींची तक्रार ॲडव्हर्टायझिंग स्टॅण्डर्ड कौन्सिल ऑफ इंडियाकडे करत आहेत. विशेष म्हणजे यात उपचारासाठी लाखो रुपये खर्च करूनही आजाराची स्थिती जैसे थे वैसेच असल्याचे अनेकांनी अनुभव शेअर करताना सांगितले आहे.

यावर नक्की दोष कोणाला द्यावा हा देखील प्रश्न आहे. कारण आपल्याकडे ॲलोपथी औषधांचे दुष्परिणाम सांगून या कंपन्या, उपचार सेंटर रुग्णाला असे काही घाबरवतात की तो ॲलोपथीचा, ऑपरेशनचा धसकाच घेतो. हीच वेळ साधत मग आमच्या उपचारांचे कोणतेही साईड इफेक्ट्स नाहीत असे सांगून रुग्ण व त्याच्या कुटुंबाचे मन वळवण्यात या सेंटरचे डॉक्टर आणि स्टाफ यांना यश मिळते. आधीच व्याधीने त्रस्त असलेल्या व्यक्तीला लवकरात लवकर आराम कसा मिळेल याची घाई असते. अनेक दिवसांपासून, महिन्यांपासून दुखणे सहन करता करता आधीच तो वैतागलेला असतो. अशावेळी आमच्या उपचारांनी, औषधांनी, थेरपींनी तुम्ही काही दिवसातच ठणठणीत व्हाल हे शब्दच त्याच्यात नवीन उमेद जागवत असतात. पण यावेळी सुजाण नागरिक म्हणून आपणही अशा प्रकारे उपचारांचा, औषधांचा दावा करणाया या कंपन्यांची योग्य पद्धतीने माहिती मिळवणे गरजेचे आहे.

कारण बयाचवेळा फक्त पैसे उकळण्यासाठी रुग्णाच्या मानसिकतेबरोबर खेळ करणाया या आरोग्य सेवेच्या उपचारपद्धती एखाद्याच्या जीवावरही बेतू शकते. यामुळे सतत जाहिरातीत झळकणाऱ्या उत्कृष्ट आरोग्य सेवा देण्याचा दावा करणाया उपचारपद्धती घेण्याआधी त्याचा तुम्हाला कितपत लाभ होणार आहे हे देखील पाहावे. कारण शरीर आजारी पडते तेव्हा मनही आजारी होतेच. शरीराचा मनावर आणि मनाचा शरीरावर परिणाम होतच असतो. त्यामुळे अगदी सर्दी खोकल्यापासून ते एखाद्या दुर्लभ आजाराचा परिणाम व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर होताना आपण पाहत असतो. यामुळे फक्त जाहिरात बघताना त्यात दाखवण्यात येणारे प्रसंग हे स्क्रिप्टवर आधारित आहे हे आधी मनाला सांगावे.

कारण एखाद्या आजाराशी, प्रसंग, घटनेशी साम्य असलेल्या गोष्टी जर आपल्या आयुष्यातही होऊन गेलेल्या असतील किंवा होत असतील तर आपण लगेच त्याबरोबर जोडले जातो. पण ही एक उत्पादन विकण्याची मार्केटिंग स्ट्रॅटेजी आहे हे सामान्य जनतेला कळत नाही. उदाहरणार्थ, जसे की रोज सकाळी काही ठराविक चॅनेल्सवर गुडघेदुखी, सांधेदुखीवरील उपचाराची जाहिरात झळकत असेल आणि जर त्याच व्याधीने तुम्ही किंवा तुमच्या घरातील, माहितीतील व्यक्तीही त्रस्त असेल तर आपण लगेच त्या जाहिरातीशी कनेक्ट होतो आणि नकळत त्या जाहिरातीमध्ये देण्यात आलेल्या फोन क्रमांकावर कॉल करून चौकशी करतो आणि कसलीही शहानिशा न करता ते सांगतील त्यावर विश्वास ठेवून पैसे भरतो आणि उपचार सुरू करतो. हीच सायकल अशीच सुरू राहते. कंपनीला ग्राहक मिळतो.

सुरुवातीचे दिवस तुम्हाला बरे वाटते. काहींना कायमचा आरामही मिळतो. पण ज्यांना मिळत नाही त्यांचे हे उपचाराचे चक्र थेरपीच्या नावाखाली वर्षानुवर्ष सुरू राहते. पैसा जात राहतो. बँक खाते रिकामे होत राहते, त्याचवेळी कंपनीचा गल्ला भरत राहतो. शेवटी ज्यावेळी या उपचारांना अर्थ नाही हे लक्षात येतं तेव्हा ग्राहककडे जाहिरातीतील प्रलोभनांना बळी पडून आम्ही कसे फसलो याची कैफियत सांगत आहेत. यामुळे ही अशा प्रकारच्या घटनांची गंभीर दखल घेतली असून आरोग्य सेवेवरील जाहिरातींसाठी कडक नियम अटी शर्थी लागू केल्या आहेत. त्याबद्दल प्रत्येक नागरिकाने सतर्क राहाणे गरजेचे आहे.

अनेक लोक आपल्या व्याधींवर जाहिरातींमधून मिळणारा मार्ग हा सोपा आणि स्वस्त समजतात. कारण त्यामुळे खर्च वाचतो, असे त्यांना वाटते. पण काही वेळा ते भलतेच महागात पडू शकते. एखादी व्यक्ती जाहिरात बघून ते औषध घेतो, त्याला आराम पडतो, त्यामुळे जेव्हा त्याच्यासारखा दुसरा व्याधीग्रस्त मित्र किंवा नातेवाईक भेटतो तेव्हा तो त्याला तेच औषध घेण्याचा सल्ला देतो. कारण त्याला आराम पडलेला असतो, पण प्रत्येकाची प्रकृती ही वेगळी असते, त्यामुळे एकच औषध सगळ्यांना सारखेच लागू होत नाही. काही वेळा त्याचा त्रासदायक परिणामसुद्धा होऊ शकतो. त्यामुळे आकर्षकरित्या प्रसारित केल्या जार्णाया जाहिरातींच्या मोहाला बळी पडू नये.

आपल्याला काही त्रास होत असल्यास त्या व्याधीशी संबंधित डॉक्टरकडे जाऊन त्यावर उपचार घेणेच योग्य आहे. जर कुणी जाहिरातीवरून औषध घेतले आणि त्यापासून त्रास झाला तर त्यावर उपाय कोण सांगणार? त्यासाठी त्याला डॉक्टरकडेच जावे लागेल. त्यापेक्षा अगोदरच डॉक्टरकडे जाऊन योग्य ते औषध घ्यावे. आजच्या काळात आजारांचेही स्वरूप बदलले आहे. एका आजारामागे इतर आजार दडल्याची अनेक उदाहरणे शेवटच्या क्षणी समोर येतात. त्यामुळे सजग नागरिकांनी स्वतःबरोबरच घरातील इतर सदस्यांसाठी आरोग्यासंबंधी निर्णय घेताना जाहिरातींना बळी न पडता प्रत्यक्ष तज्ञमंडळींचाच सल्ला घेणे शहाणपणाचे ठरेल. नाहीतर तेल गेलं तूप गेलं हाती राहिलं धुपाटणं, अशी गत होण्यास वेळ लागणार नाही.

भारताची चिंता वाढणार

रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाया देशांविरोधात ५०० टक्क्यांपर्यंत आयातशुल्क (टॅरिफ) लावण्यासंबंधीच्या विधेयकाला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी तत्वतः मंजुरी दिली आहे. 'सँक्शनिंग रशिया ॲक्ट' नावाचे हे विधेयक पुढच्या आठवड्यात अमेरिकेच्या संसदेत अर्थात काँग्रेसमध्ये मांडले जाईल. या विधेयकाला डेमॉक्रॅट आणि रिपब्लिकन अशा सत्ताधारी व विरोधी पक्षातील ८४ जणांचा पाठिंबा असल्याचे म्हटले जाते. त्यामुळे हे विधेयक बहुमताने काँग्रेसमध्ये मंजूर होण्याची चिन्हे आहेत. हे विधेयक मंजूर होताच भारताची चिंताही पाचशे पटीने वाढणार आहे. २०२२ च्या फेब्रुवारी महिन्यात रशिया-युक्रेन युद्धाला सुरुवात झाली होती. यंदाच्या फेब्रुवारीत दोन्ही देशांमधील या युद्धाला ४ वर्षे पूर्ण होतील. तरीही हे युद्ध थांबण्याची चिन्हे नाहीत. चार वर्षांपूर्वी युद्धाला तोंड फुटताच टिकलीएवढ्या युक्रेनला नमवायला रशियाला ४ दिवसही पुरेसे ठरतील, असे म्हटले जात होते. प्रत्यक्षात घडले उलटेच. रशियन सैन्य युक्रेनच्या सीमेलगतच्या प्रत्येक शहरांत मुसंडी मारत असताना युक्रेनचे सैन्य प्राणपणाने लढत होते. युक्रेनचा पाडाव झाल्यास रशिया युरोपच्या तोंडावर मांडी घालून बसण्याच्या भीतीने अमेरिका आणि युरोपियन देशांनी युक्रेनला युद्धसामुग्री आणि आर्थिक रसद पुरवठा सुरू केला, तसे युक्रेनियन सैन्यानेही चिवट संघर्षाच्या जोरावर रशियन सैन्याला अनेक भागांतून हुसकावून लावले. याच दरम्यान रशियाचे आर्थिक खच्चीकरण करण्याच्या उद्देशाने अमेरिकेसह युरोपियन देशांनी रशियावर ५०० हून अधिक निर्बंध लादले, व्यापारी संबंध तोडले, अनेक देशांमधील रशियाची बँक खाती गोठवण्यात आली. आर्थिक नाकेबंदी केल्यावर रशियाची युद्धखोरी कमी होईल, असा अमेरिकेचा कयास होता. मात्र, एवढे करूनही रशियन सैन्य नमलेले नाही, उलट युक्रेनवरील हल्ले दिवसेंदिवस तीव्र होत चाललेत. यामागे रशियन कच्चे तेल, नैसर्गिक वायू, युरेनियम व रेअर अर्थ मटेरियलचा मोठा हात असल्याचे म्हटले जात आहे. जेव्हापासून हे युद्ध सुरू झाले, तेव्हापासून रशियाने मित्र राष्ट्रांना अत्यंत स्वस्त दरात कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा करायला सुरुवात केली. यामध्ये प्रामुख्याने चीन, भारत, ब्राझील व आफ्रिकेतील काही देशांचा समावेश आहे. शिवाय हा व्यापारही अमेरिकन डॉलरऐवजी रशियाचे चलन रुबल किंवा त्या त्या स्थानिक देशाच्या चलनात होऊ लागला. या देशांनी रिफाइन केलेले कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू खुद्द युरोपियन देश विकत घेऊन आपल्या इंधन गरजा भागवत होते. तर दुसरीकडे अमेरिकाही रशियाकडून युरेनियम आणि रेअर अर्थ मटेरियल विकत घेतच होता. या देशांनी भारतावर रशियाकडून कच्चे तेल विकत घेण्याचा ठपका लावताच भारत आणि रशियाने वेळोवेळी ही दुटप्पी भूमिका उघड केली. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांना मिरच्या झोंबणे स्वाभाविकच होते. ट्रम्प यांना जागतिक शांतीदूत म्हणवून घ्यायची केवळ खुमखुमीच नाही, तर गळ्यात शांततेचे नोबेल पारितोषिक लटकवण्यासाठी त्यांची सातत्याने धडपड सुरू आहे. त्यातून त्यांनी भारत-पाक संघर्ष थांबवल्याचा दावा केला होता. गाझा-इस्त्रायल युद्ध, इस्त्रायल-इराण युद्ध, कंबोडिया-थायलंड युद्धही मीच थांबवले असे ते अधूनमधून सांगत असतात. अर्थात भारताने त्यांच्या दाव्यांना किंमत न दिल्याने ते भारतावर खार खाऊन आहेत. आपण सत्तेत येताच पाचव्या मिनिटाला रशिया-युक्रेन युद्ध थांबवू अशी पुडी त्यांनी सोडली होती. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेक शांतीचर्चा केल्या. व्लादिमिर पुतीनची भेटही घेतली, तरी त्यांना युद्धाचा गुंता सोडवण्यात यश आलेले नाही. हेच अपयश ट्रम्प यांना सातत्याने ठसठसत असून याचा दुहेरी राग ते भारतावर काढत आहेत. डोनाल्ड ट्रम्प हे पक्के बिझनेसमन. त्यामुळे आपल्या अटीशर्थींवर प्रत्येक देशाने द्विपक्षीय व्यापार करार करावा यासाठी त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार कराराचे उल्लंघन करत मनमानी पद्धतीने अनेक देशांवर टॅरिफ लादले. ज्यामध्ये भारताचाही समावेश आहे. भारतावर ट्रम्प प्रशासनाने व्यापार तुटीसाठी २५ टक्के, तर रशियाकडून कच्चे तेल विकत घेतल्यावरून अतिरिक्त २५ असा एकूण ५० टक्के टॅरिफ लादला. या टॅरिफच्या भीतीने ऑस्ट्रेलिया, जपानसारख्या काही देशांप्रमाणे भारतही झुकेल असे ट्रम्प यांना वाटत होते. परंतु, भारत अजूनही या दबावाला बळी पडलेला नाही. भारताने ट्रम्प यांच्या नाकावर टिच्चून डेअरी-फिशरी प्रॉडक्ट, ज्वेलरी, कृषी उत्पादने आदींसाठी पयार्यी बाजारपेठा शोधल्या. इंग्लंडपाठोपाठ ओमान, न्यूझीलंडसोबत द्विपक्षीय मुक्त व्यापार करारही केला. एवढेच नाही, तर वर्षअखेरीस पुतिन यांचा दौरा आयोजित करून त्यांच्यासोबत अनेक व्यापारी करार भारताने केले, त्यामुळे ट्रम्प यांची पोटदुखी वाढली आहे. त्यामुळेच आता ते भारतावर ५०० टक्क्यांपर्यंत टॅरिफ लादण्याच्या तयारीत आहेत. आतापर्यंत ५० टक्के टॅरिफ भारताने कसाबसा सहन केला,

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२० जानेवारी २०२६ ते २६ जानेवारी २०२६

कोकणत 'दिल्ली लॉबी' विरोधात संपूर्ण गाव पेटून उठलं

'परप्रांतियांना जमिनी विकणार नाही' म्हणत ग्रामदेवतेसमोर कोकणातील गावाने घेतली शपथ

मुंबई। कोकणतलं एक गाव दिल्ली लॉबीच्या विरोधात एकत्र आलं आहे. कोकणातला अनेक भाग हा इकोसेन्सिटिव्ह झोनमध्ये येतो. या भागांमध्ये आता अतिक्रमण होताना दिसत आहे. त्यामुळे गावकऱ्यांनी चक्क आपल्या ग्रामदेवतेसमोर नारळ देऊन शपथ घेतली आहे.

पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील अशा इकोसेन्सिटिव्ह झोनमध्ये असलेल्या कोलझर गावामध्ये परप्रांतीय लोकांचा वावर वाढला आहे. ग्रामस्थांना आलेल्या या संशयामुळे त्यांनी आपल्या जमिनी आणि निसर्गाबाबत एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आपल्या गावचं आणि जमिनी, निसर्गाचं रक्षण करण्यासाठी कोलझरमधील ग्रामस्थ एकवटले असून त्यांनी ग्रामदेवतेला नारळ देत शपथ घेतली आहे.




गेल्या काही दिवसांपासून गावांत अनधिकृत उत्खनन सुरु असल्याचं समोर आलं आहे. तसेच जमिनींचे व्यवहार देखील घडल्याचा त्यांचा संशय आहे. याबाबत अद्याप अधिकृतपणे माहिती समोर आलेली नाही पण भविष्यात गावातील जमिनी परप्रांतीयांच्या हातात जाऊ नये म्हणून ग्रामस्थ सावध आहेत. त्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला आहे.

वनशक्ती या संस्थेने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेवरील निर्णयामुळे केंद्राने अधिसूचना काढून कोलझर गाव इकोसेन्सिटिव्ह झोन म्हणून जाहीर केले. याशिवाय येथे २०१८ पपासून वृक्षतोड बंदी आदेश देखील लागू केले आहेत. असे असूनही गेल्या आठवड्यात खिश्चनवाडीपासून घनदाट जंगलापर्यंत अवैधत्यरित्या खनिजयुक्त मातीचे उत्खनन देखील करण्यात आले. यामुळे गावकऱ्यांनी ग्रामदेवतेला नारळ देत शपथ घेतली ही परप्रांतियांना जमिनी विकल्या जाणार नाहीत. कारण गावात अवैध होत असलेल्या उत्खननामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. तसेच येथील जैवविविधतेला धोका पोहोचत आहे. या जंगलात पट्टेरी वाघासह अन्नसाखळीतील अनेक दुर्मिळ प्राणी, पक्षी आणि इतर घटक यांचा अधिवास आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोलझर गावातील लोकांनी ही शपथ घेतली आहे.

हकालपट्टीनंतरही बांगलादेशी महिलांचा पुन्हा बेकायदेशीर मुंबईत प्रवेश

महिलांकडे भारतीय बनावट कागदपत्र

तपासादरम्यान दोन्ही महिलांच्या मोबाईल फोनमध्ये बांगलादेशी ओळखपत्रांच्या प्रती आढळून आल्या. याशिवाय, भारतात वास्तव्यासाठी त्यांनी बनावट भारतीय कागदपत्रे तयार केल्याचेही समोर आले. पोलिसांनी दोघींनाही भायखळा येथील महिला कारागृहात पाठवले आहे. बेकायदेशीर प्रवेश आणि परदेशी नागरिक कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना पुन्हा बांगलादेशला पाठवले जाणार आहे.



मुंबई। हद्दपार केल्यानंतर पुन्हा बेकायदेशीर प्रवेश करून मुंबईत परतण्याच्या घटनांनी सुरक्षा यंत्रणांसमोर गंभीर प्रश्न उभे केले आहेत. ऑगस्ट २०२५ मध्ये बांगलादेशला पाठवलेल्या दोन बांगलादेशी महिलांनी काही कालावधीतच बेकायदेशीर सीमा ओलांडून भारतात प्रवेश करून मुंबई गाठल्याचे उघड झाले आहे. सोमवारी कफ परेड आणि गेटवे ऑफ इंडिया परिसरातून पोलिसांनी या दोघींना पुन्हा ताब्यात घेतले.

बेकायदेशीर सीमा ओलांडून पुन्हा मुंबईत प्रवेश

पोलीस तपासानुसार, पश्चिम बंगाल सीमेवरून हद्दपार झाल्यानंतर या महिला उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील घोजाडांगा परिसरातील जंगलमय, बेकायदेशीर मागार्चा वापर करून पुन्हा भारतात शिरल्या. त्यानंतर रेल्वे व इतर साधनांनी त्या मुंबईत दाखल झाल्या. अटक करण्यात आलेल्या महिलांची ओळख झुलेखा जमाल शेख आणि बिल्किस बेगम सिरामिया अख्तर झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, झुलेखा शेखला ऑगस्ट २०२५ मध्ये आग्रीपाडा पोलिसांनी पकडले होते. इमिग्रेशन यंत्रणांच्या मदतीने तिला पश्चिम बंगाल सीमेवरून बांगलादेशला पाठवण्यात आले होते. त्याचप्रमाणे, बिल्किस अख्तरला गुन्हे शाखेच्या युनिटकडून अटक करून बांगलादेशात हद्दपार करण्यात आले होते. मात्र, हद्दपारीनंतर अल्पावधीतच दोघींनी पुन्हा अवैधरीत्या भारतात प्रवेश केला.

घुसखोरी पोलिसांसमोर आव्हान

पोलिसांचे म्हणणे आहे की पहिल्यांदा पकडल्यावर अनेक घुसखोरांना सीमेवरून परत पाठवले जाते, मात्र मोठ्या संख्येने व्यक्ती पुन्हा अवैध मार्गाचा वापर करून भारतात येतात. मुंबईसारख्या महानगरांत मजुरी आणि छोट्या कामांमुळे अशा व्यक्तींची ओळख पटवणे आणि सतत देखरेख ठेवणे हे आव्हान ठरत आहे.

याआधीही अशीच घटना समोर आली होती. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये हद्दपार करण्यात आलेली बांगलादेशी महिला काही दिवसांतच महाराष्ट्रात परतली होती आणि पुण्यात स्थायिक झाली होती. तिच्याकडे वेगवेगळ्या नावांनी दोन आधार कार्ड आढळून आल्याने खळबळ उडाली होती. अशा घटनांमुळे हद्दपारीनंतरही पुन्हा प्रवेश रोखण्याबाबतच्या यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

कोल्हापुरात काळी बाहुली, लिंबू अन् टाचण्या

ठाकरेंच्या शिलेदारावर भानामतीचा प्रकार... मतदानाच्या तोंडावर खळबळ

कोल्हापूर। राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाची तयारी पूर्ण होऊन सर्वांचे लक्ष मतदानाकडे लागले आहे. त्यातच कोल्हापूर जिल्ह्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा प्रमुख रविकिरण इंगवले यांच्यावर राधानगरी तालुक्यातील दुर्गमानवाड येथे भानामती केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाच्या ठीक आदल्या दिवशी हा प्रकार समोर आल्याने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात तीव्र खळबळ उडाली आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून रविकिरण इंगवले शहरातील विविध स्थानिक समस्या, सामाजिक प्रश्न आणि विकासाच्या मुद्द्यांवरून आंदोलने करत आहेत. महापालिका निवडणुकांच्या प्रचारावेळी महायुतीच्या नेत्यांवर गुन्हेगारी पार्श्वभूमी, भ्रष्टाचार आणि नातेवाईकांना उमेदवारी देण्याचे गंभीर आरोप त्यांनी केले. बलभीम बँक घोटाळा, आमदार पुत्राची उमेदवारी यासह विविध मुद्द्यांवरुन त्यांनी प्रचारसभांमधून जोरदार हल्ला चढवला होता. या काळात इंगवले यांनी कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रभागांतील रस्ते, पाणीपुरवठा आणि ड्रेनेजसारख्या समस्या उपस्थित करून नागरिकांमध्ये पक्षाची पकड मजबूत केली. पक्षाच्या वचननामा प्रकाशन सोहळ्यातही त्यांनी उपस्थिती लावून विकासाभिमुख भूमिका मांडली. महायुतीच्या उमेदवारांविरुद्ध त्यांचे आरोप निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिक तीव्र झाले होते. महिलांकडे भारतीय बनावट कागदपत्र सोमवारी मध्यरात्री राधानगरी तालुक्यातील दुर्गमानवाड देवस्थान मंदिराजवळील झाडावर इंगवले यांचा फोटो खिळे ठोकून भानामती करण्यात आली होती. काळी बाहुली, लिंबू, टाचण्या यांसारखे साहित्य वापरल्याची माहिती समोर आली असून, हा प्रकार आज सकाळी ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांना आढळला. त्यांनी तात्काळ इंगवले यांना कळवले. मतदानाच्या एका दिवस आधी असा प्रकार घडल्याने दुर्गमानवाड आणि परिसरात भीतीचे वातावरण पसरले. स्थानिक कार्यकर्ते व नागरिकांनी घटनास्थळी जमा होऊन निषेध व्यक्त केला. कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट आघाडीने

तस्करीमध्ये क्रिप्टोकरन्सीचा वापर वाढला

राजस्व गुप्तचर संचालनालयाचा अहवाल

मुंबई। राजस्व गुप्तचर संचालनालय (डीआरआय) यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात सोने, अमली पदार्थांच्या तस्करीसाठी क्रिप्टोकरन्सीचा वापर अलीकडच्या वर्षात लक्षणीयरीत्या वाढल्याचे नमूद केले आहे. यूएसडीटीसारखी स्टेबलकॉइन्स पारंपरिक हवाला नेटवर्कची जागा घेत असल्याचेही अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. या डिजिटल मालमत्तांमुळे जलद व गुप्त आर्थिक व्यवहार शक्य होत असून त्यावर मर्यादित देखरेख आहे आणि मनी लॉन्डरिंगविरोधी नियमांचे पालन कमकुवत असल्याचे डीआरआयने नमूद केले आहे. डीआरआयनुसार, अनेकदा अज्ञात असलेली आणि व्हीपीएनद्वारे सहज



वापरता येणारी क्रिप्टो वॉलेट्स 'ऑफ-द-बुक' बेकायदेशीर पेमेंटसाठी वापरली जात आहेत. यात कमी किंमत दाखवलेली (अंडर-इनव्हॉइस्ड) किंवा चुकीची माहिती दिलेली आयात समाविष्ट असून त्यामुळे तस्कर सीमाशुल्क शुल्क, कर आणि इतर नियामक अटी चुकवतात. बिटकॉइनसारख्या क्रिप्टोकरन्सींच्या अर्ध-अज्ञात स्वरूपामुळे फसवणूक करणाऱ्यांना आपली ओळख लपवता येते. ज्यामुळे तपास व अंमलबजावणी कठीण होते. सोन्याची आणि अंमली पदार्थांची तस्करी करताना विक्रीतून मिळालेली रक्कम हवाला मार्गे किंवा क्रिप्टोकरन्सीतून परदेशातील सूत्रधारांकडे पाठवली जाते. जुलै २०२४ मध्ये डीआरआयने आंतरराष्ट्रीय सोन्याच्या तस्करीचे जाळे उघडकीला आणले होते. या प्रकरणात १०८ किलो परदेशी सोन्याची तस्करी इंडो-चीन सीमेवरून खेचर आणि हमालांच्या माध्यमातून करण्यात आली होती. हे सोने दिल्लीला पोहोचल्यानंतर सराफ व परकीय चलन व्यवहार करणाऱ्यांमार्फत विकण्यात आले.

शेजाऱ्याने फूस लावून निर्जनस्थळी नेलं अन्...

मारहाणीत पीडितेच्या आईचा गर्भपात

मुंबई। बिहारमध्ये एका 5 वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न करण्यात आल्याची बातमी समोर आली आहे. इतकेच नव्हे तर, पीडितेच्या नातेवाईकांनी याचा विरोध केल्यास त्यांना मारहाण करण्यात आली आणि या हाणामारीत मुलीच्या आईचा गर्भपात झाल्याचं सांगितलं जात आहे. संबंधित प्रकरण हे बिहारच्या मुजफ्फरपूर जिल्ह्यातील आहे. येथील गावात एका 5 वर्षीय मुलीवर तिच्या शेजारी राहणाऱ्या तरुणाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, पीडितेचा आरडाओरडा ऐकून आसपासचे लोक घटनास्थळी पोहोचले आणि त्यावेळी, आरोपी तिथून फरार झाला. घटनेनंतर, पीडितेचे नातेवाईक आरोपीच्या घरी गेल्यानंतर त्यांच्यासोबत मारहाण करण्यात आली. पीडित मुलीची आई गर्भवती होती आणि मारहाणीदरम्यान तिचा गर्भपात झाला. संबंधित प्रकरणाची तक्रार मिळताच, पोलिसांनी तातडीने कारवाई करत मंगळवारी पाच आरोपींना अटक केल्याची माहिती आहे. यामध्ये, राजेश दास, मिथिलेश दास, रिंकू देवी आणि सरिता देवी या आरोपींचा समावेश आहे.



ठाण्यातील २१ वर्षीय एअर होस्टेसने संपवलं आयुष्य

मुंबई। ठाणे जिल्ह्यातून एका २१ वर्षीय एअर होस्टेसने आत्महत्या केल्याची बातमी समोर आली आहे. त्यानंतर, पोलिसांनी पीडितेच्या एक्स बॉयफ्रेंडवर तिला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल केला आहे. संबंधित तरुणीने २८ डिसेंबर २०२५ रोजी कल्याण (पूर्व) येथील तिच्या घरी फाशी घेत आत्महत्या केल्याची माहिती आहे.

प्रेयसीचे प्रायव्हेट फोटो व्हायरल करण्याची धमकी अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, पीडितेला तातडीने रुक्मिणीबाई रुग्णालयात नेण्यात आलं. तिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं. कुटुंबियांच्या म्हणण्यानुसार, मृत तरुणी आणि तिचा एक्स बॉयफ्रेंड २०२० पासून प्रेमसंबंधात होते. आरोपानुसार, तिच्या प्रियकराने तिला तिचे काही प्रायव्हेट फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली होती आणि लग्न करण्यासाठी नकार दिला होता. इतकेच नव्हे तर, तो नुकतंच एका दुसऱ्या महिलेसोबत प्रेमसंबंधात होता आणि त्यामुळेच, तिने स्वतःचं आयुष्य संपवलं.

अंत्यसंस्कार झाल्यानंतर, कुटुंबियांनी तिचा फोन आणि बँक स्टेटमेंट तपासले, ज्यामध्ये बऱ्याच बाबी उघडकीस आल्या. तिच्या शरीरावर सापडलेल्या चॅट रेकॉर्ड आणि खुणांवरून आरोपीने तिच्यावर वारंवार हल्ला केला असल्याचं दिसून आलं. मिळालेल्या माहितीनुसार, पीडितेच्या प्रियकराने लग्नाच्या बहाण्याने तिच्याकडून लाखो रुपये घेतले होते आणि १६ डिसेंबर २२५ रोजी तिचं शेवटचं ट्रान्सझेक्शन झाल्याचं तरुणीच्या बँक अकाउंटवरून स्पष्ट झालं.

तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम १०८ अंतर्गत त्या व्यक्तीविरुद्ध एफआयआर दाखल केला असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत असल्याचं सांगितलं जात आहे.

छताला लटकलेल्या अवस्थेत आढळली

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणीचा मोबाईल फोन आणि आर्थिक रेकॉर्ड तपासल्यानंतर, कोळसेवाडी पोलिसांनी १० जानेवारी रोजी तिच्या २३ वर्षीय माजी जोडीदाराविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, २८ डिसेंबर रोजी रात्री तरुणीला तिच्या आईने फोन केला असता तिला त्याचं उत्तर मिळालं नाही. त्यानंतर, त्यानंतर कल्याणमधील अनुसूया निवास येथील तिच्या घरी जाऊन पाहिल्यानंतर छताच्या हुकला लटकलेला तरुणीचा मृतदेह आढळला.

मृतदेहाचे तुकडे खाण्यासाठी अज्ञात व्यक्तीची केली हत्या



मुंबई। पश्चिम बंगालच्या कूचबिहार जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका व्यक्तीने मृतदेहाचे तुकडे खाण्यासाठी एका अज्ञात व्यक्तीची हत्या केली. पोलीस अधिकाऱ्यानं दावा केला की, चौकशीदरम्यान, आरोपीने पीडितेचं मांस खाण्याच्या हेतूने हत्या केल्याचा कबुलीनामा दिला. ही घटना कूचबिहार जिल्ह्यातील दिनहाट येथील कुर्शत परिसरात घडली, यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं.

नेमकं काय घडलं?

पोलिसांनी सांगितलं की, मृताची अद्याप ओळख पटवण्याचा पोलीस प्रयत्न करत आहेत. मृत व्यक्ती ही परिसरातील स्मशानभूमीजवळील असलेल्या एका झोपडीत राहत होती. कुर्शात येथील एका तलावत तो मृतावस्थेत आढळला. वृत्तानुसार, मतदेह आढळून आल्यानंतर पोलिसांनी तपास सुरु केला. संशयित आरोपीचं नाव दौस आलम असल्याचं सांगण्यात येत आहे. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

आरोपीने 'त्या' गोष्टीसाठी अज्ञात व्यक्तीची केली हत्या

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दारूच्या नशेत असून या प्रकरणात पोलिसांनी दावा केला की, आरोपीने अज्ञात व्यक्तीची हत्या करण्यात आली होती, नंतर मृतदेह हा पाण्याच्या टाकीत नेला, तो स्वच्छ करत लपवण्यात आला. चौकशीदरम्यान. आरोपीने हत्येचा कबुलीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीने मानवी मांस खाण्याच्या उद्देशाने ही हत्या केली. हे नरभक्षकाचे लक्षण असल्याची दुर्मिळ घटना घडली आहे.

यानंतर त्यांनी पुढे सांगितलं की, स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपीबाबतची माहिती मिळाली, नंतर त्याला अटक केली. सध्या या प्रकरणाची सखोल चौकशी केली जात आहे.

नेमकं काय झालं?

लोकलचे बनावट तिकीट घेऊन प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र गेल्या काही दिवसांपासून दिसत आहे. मध्य आणि पश्चिम या दोन्ही रेल्वे मार्गावर फसवणुकीच्या अनेक घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे टीसींनी (तिकीट तपासनीस) अशा बनावट प्रवाशांविरोधात तपासणी मोहीम तीव्र केली असून शुक्रवारी चर्चगेट-विरार लोकल मार्गावर या तपासणीदरम्यान एक बनावट लोकल तिकीट (यूटीएस पास) टीसींनी पकडलं. जलद चर्चगेट लोकलमधील महिलांच्या प्रथम श्रेणीच्या डब्यात दीपिका मूर्ती तिकीट तपासत होत्या. तेव्हा एका तरुणीने त्यांना मोबाईलवरचा पास दाखवला. त्याची मुदत १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ होती.

लव्ह के लिए साला कुछ भी करेगा! गर्लफ्रेंडला खुश करण्यासाठी 'भन्नाट' आयडिया!

मुंबई। प्रेम आंधळं असतं असं म्हणतात. एखादी व्यक्ती प्रेमात पडली की त्यासाठी ती काहीही करू शकते. आपल्या प्रेयसीला चांद-तारें तोडून आणून देण्याची भाषा करणारे अनेक प्रियकर आपण पाहिलेत, मोठ्या पडद्यावरही अशी अनेक वचनं प्रेयसीला त्यांचे प्रियकर देताना दिसले. पण रोजच्या धकाधकीच्या आयुष्यात आपल्या प्रेयसीसाठी भवन्नाट आयडिया करून तिला एसी लोकलचा बनावट पास तयार करू देणाऱ्या एका भामट्या प्रियकराची आयडिया पाहून मात्र पोलीसही थक्क झाले. पण कानून के हात लंबे होते है या न्यायाने अखेर फसवणूक करणाऱ्या त्या इसमाविरोधात आणि त्याच्या मैत्रिणीविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एसी लोकलचा बनावट पास आणि त्यासाठी बनावट यूटीआय ॲप तयार करण्यात आल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. याप्रकरणी दोघांविरोधात वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

मात्र ते पाहून तिकीट तपासनीस मूर्ती यांना थोडं संशयास्पद वाटलं. त्यांनी ती प्रवासी महिला प्रीती हिच्याकडे विचारणा केली. पण तिने नीट न सांगता, उडवाउडवीची उत्तरं दिली. ज्यामुळे टीसीचा संशय आणखीनच वाढला. म्हणून पुढील तपासणीसाठी त्यांनी तिला वांद्रे येथे उतरवलं आणि डीसीटीआय कंट्रोलद्वारे तिची चौकशी करण्यात आली. तेव्हा तिच्या मोबाईलवर असलेला यूटीआय पास हाँ खरा नसून खोटा, बनावट असल्याचे स्पष्ट झाले. ते पाहून अनेकांना धक्का बसला. त्या महिलेला खडसावण्यात आल्यावर अखेर तिने तो पास खोटा असल्याचे आणि एका मित्राने बनवून दिल्याचं कबूल केलं. त्याने तिला व्हॉट्सॲपद्वारे एक बनावट यूटीएस ॲप्लिकेशन पाठवल्याचंही तिने सांगितलं, अशी माहिती पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली.


हे प्रकरण उघडकीस आल्यावर त्यांनी ती प्रवासी महिला आणि बनावट ॲप तयार करणारा तिचा अभियंता मित्र अनुज गुप्ता या दोघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. वांद्रे पोलिस याप्रकरणात आणखी तपास करत आहेत.



पत्नी अन् आईचं डोकं वीटेने ठेचून खून केला, अन् सिकंदर गुप्ता दोघींचं मांस खात होता... पोलिसांना भयंकर दृश्य दिसलं

मुंबई। पत्नी आणि स्वतःच्या आईची अत्यंत अमानुषपणे हत्या करुन युवकाने त्यांचं मांस खाल्ल्याची धक्कादायक घटना कुशीनगर जिल्ह्यात उघडकीस आली आहे. सिकंदर गुप्ता असं या दुहेरी हत्याकांडांतील आरोपीचे नाव आहे. ३२ वर्षीय सिकंदर गुप्ता मुंबईत शटरिंगचे काम करणारा करायचा. काही महिन्यांपूर्वीच आपल्या मूळ गावी परसा येथे परतला होता. मात्र, परतल्यानंतर घडलेल्या या घटनेने संपूर्ण गाव हादरून गेलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १२ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास सिकंदर गुप्ता आपल्या ६० वर्षीय आई रूना देवी आणि पत्नी प्रियंका यांच्यासोबत घराच्या छतावर शेकटी पेटवून ऊब घेत बसला होता. यावेळी सिकंदर दारूच्या नशेत असल्याचं सांगितलं जात आहे. याच दरम्यान पती-पत्नीमध्ये कोणत्या तरी कारणावरून वाद झाला. हा वाद काही वेळातच टोकाला गेला. यावेळी रागाच्या भरात सिकंदरने जवळच असलेला दगड उचलून पत्नी प्रियांकाच्या डोक्यावर जोरदार घाव घातला. या हल्ल्यात प्रियंका गंभीर जखमी झाली. हा प्रकार पाहून आई रूना देवी घाबरल्या आणि



त्यांनी मुलाला थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, संतापलेल्या सिकंदरने आईलाही सोडलं नाही. त्याने त्याच दगडाने आईच्या डोक्यावरही वार केला. इतक्यावरच सिकंदर थांबला नाही. तो दोघींच्या डोक्यावर दगडाने घाव घालत राहिला. काही वेळात दोघींचाही मृत्यू झाला आणि त्या रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पाहायला मिळाल्या.

घटनेदरम्यान मोठा गोंधळ आणि आरडाओरड झाली. शेजाऱ्यांना संशय येताच त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. मात्र, पोलिस घटनास्थळी पोहोचताच सिकंदर अधिकच आक्रमक झाला. त्याने छतावरून पोलिसांवर दगडफेक केली. मोठ्या प्रयत्नानंतर पोलिसांनी छतावर जाऊन त्याला ताब्यात घेतलं. त्यावेळी सिकंदरच्या हातांवर रक्त पडलेलं होतं. पोलिसांनी सांगितलं की, छतावर दोन्ही महिलांचे मृतदेह विद्रूप अवस्थेत पडले होते. काही प्रत्यक्षदर्शींनी आरोपी मृतांचं मांस इथे-तिथे फेकत असल्याचंही सांगितलं.

अटक केल्यानंतर मेडिकल तपासणीसाठी सिकंदरला रुग्णालयात नेण्यात आलं. तेथेही त्याने असभ्य वर्तन केलं. त्याने डॉक्टरांच्या तोंडावर थुंकल्याचं सांगितलं जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, थुंकताना त्याच्या तोंडातून रक्तासह मांसाचा तुकडाही बाहेर पडल्याचं सूत्रांनी सांगितलं. त्यामुळे हत्या केल्यानंतर मृतांचं मांस खाल्ल्याचीही भीती व्यक्त केली जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीची मानसिक अवस्था संशयास्पद वाटत होती. मात्र, वैद्यकीय तपासणीत तो नॉर्मल असल्याचं समोर आलं. सिकंदर आणि प्रियंका यांच्या लग्नाला काही वर्षे झाली होती, मात्र त्यांना अपत्य नव्हतं. याच कारणामुळे सिकंदर मानसिक तणावात होता आणि तो मोठ्या प्रमाणात दारू पित असल्याचंही पोलिसांनी सांगितलं. कुशीनगरचे अपर पोलीस अधीक्षक सिद्धार्थ वर्मा यांनी सांगितलं की, दोन्ही मृतदेहांचं पोस्टमॉर्टम करण्यात आलं असून आरोपी सिकंदर गुप्ताला अटक करून न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आलं आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून कायदेशीर कारवाई केली जात असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com